cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com    नवी दिशा... नवे विचार.....    email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४६ | शनिवार दि.०३ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

### स्वर्थापोटी नैतिकतेचे धिंडवडे

सरकारी नोकरीवर जशा उड्या पडतात तशाच पक्षाच्या उमेदवारीसाठी पडल्याचे गेल्या काही दिवसांत दिसून आले आहे. राज्यातील एकोणतीस महानगरपालिकांची निवडणूक होणार आहे. यासाठी राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारीसाठी इच्छुक हातघाईवर आल्याचे प्रखरपणे दिसून आले.

## थोडक्यात...

### नार्वेकरांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

मुंबई: मुंबई महापालिका निवडणुकीच्या धामधुमीत कुलाबा परिसरात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सत्तेचा गैरवापर करून लोकशाहीचा खून केल्याचा खळबळजनक आरोप काँग्रेसने केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य निवडणूक आयोगाला पत्र लिहून नार्वेकरांवर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. सपकाळ यांनी पत्रात नमूद केले की, नार्वेकर यांनी आपल्या कुटुंबातील उमेदवारांसाठी प्रशासनावर दबाव आणला आणि विरोधी उमेदवारांना अर्ज भरण्यापासून धमकावून रोखले. तसेच, विधानसभा अध्यक्षांच्या कार्यालयातील ७० शासकीय कर्मचारी प्रचारात सक्रिय असल्याचाही आरोप त्यांनी केला.

### ठाकरे बंधूंकडून मुंबईसाठी 'वचननामा' जाहीर

मुंबई: आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी आदित्य आणि अमित ठाकरे यांनी मुंबईच्या विकासाचा संयुक्त आराखडा सादर केला. यात घरकाम करणाऱ्या नोंदणीकृत महिलांना दरमहा १,५०० रुपये 'स्वाभिमान निधी' आणि १ लाख तरुणांना स्वयंरोजगारासाठी २५ हजार ते १ लाखापर्यंत अर्थसहाय्य देण्याचे महत्त्वाचे आश्वासन दिले आहे. मुख्य तरतुदींमध्ये 'बेस्ट'चे तिकीट दर ५ ते २० रुपयांपर्यंत मर्यादित ठेवणे, १०० युनिटपर्यंत मोफत वीज आणि ५ वर्षांत १ लाख परवडणारी घरे देण्याचा संकल्प केला आहे. आरोग्य क्षेत्रात ५ नवीन वैद्यकीय महाविद्यालये आणि मुंबई पालिकेचे स्वतःचे कॅन्सर रुग्णालय उभारण्यावर भर दिला आहे. तसेच, मुंबईतील मोकळ्या जागा आणि रेसकोर्स बिल्डरांच्या घशात जाऊ न देण्याचा निर्धार ठाकरे बंधूंनी व्यक्त केला आहे.

### किडनी रॅकेटचे धागेदोरे तामिळनाडूच्या मंत्र्यापर्यंत

चंद्रपूर: किडनी विक्रीत तरबेज झालेल्या आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय रॅकेटचे युनिव्हर्सल डोनर म्हणून ओ रक्तगटाची व्यक्तीच पहिले टार्गेट असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. तामिळनाडूतील त्रिची येथील स्टार किम्स हॉस्पिटलमध्ये बेकायदेशीररीत्या डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी, दिल्लीचे डॉ. रवींद्रपाल सिंग हे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करायचे. भूलतज्ज्ञ व अन्य एक डॉक्टर सहकार्य करायचा. कोरोनानंतर स्टार किम्स हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपणाचा खरा गोरखधंदा सुरू झाला. हिमांशू भारद्वाजचीसुद्धा किडनी याच हॉस्पिटलमध्ये जुलै २०२४ मध्ये काढण्यात आली. पोलिसांच्या लेखी या संपूर्ण रॅकेटचा खरा सूत्रधार सोलापूरचा रामकृष्ण सुंचू म्हणजेच डॉ. कृष्णाच आहे. त्याने महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणासह विविध राज्यांत एजंटांचे जाळे उभारले होते. त्याच्या माध्यमातून येथे जवळपास ७० जणांच्या किडनी काढल्या आहे. यामागील कोट्यवधींच्या व्यवहाराचा तपास पोलिस पथक करीत आहे.

### अर्ज मागे घेण्यावरुन मनसे पदाधिकाऱ्याची हत्या

सोलापूर : महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात राजकीय वादातून एकाची हत्या करण्यात आली असून, बाळासाहेब सरवदे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी असलेल्या बाळासाहेब सरवदे यांची राजकीय वादातून हत्या झाल्याचा आरोप केला जात असून या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. सोलापूर महापालिका प्रभाग २ मध्ये अर्ज माघारी घेण्यावरून भाजपच्या दोन गटात वाद झाला. प्रभाग दोनमध्ये शालन शिंदे ह्या भाजपच्या अधिकृत उमेदवार आहेत, तर त्यांच्याविरोधात भाजपच्या बंडखोर रेखा सरवदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. रेखा सरवदे यांनी अर्ज माघारी घ्यावा यासाठी शिंदे आणि सरवदे या दोन गटात मोठा वाद झाला.

# शेतकऱ्यांच्या २ लाखांपर्यंतच्या कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ

## १ जानेवारीपासून शासन आदेश झाला लागू

पुणे । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांना शेती आणि पीक कर्जाशी संबंधित २ लाखांपर्यंतच्या व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पूर्णतः माफ करण्यात आले आहे. यासंदर्भात आदेश महसूल आणि वन विभागाने जारी केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतच्या शेती अथवा पीक कर्जाशी संबंधित निष्पादीत केलेल्या अधिस्वीकृती, रोखपत्र करारनामा, हक्कविलेख निक्षेप, हडप, तारण अथवा तारण गहाण, हमीपत्र गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणखत, गहाणाचे सूचनापत्र किंवा घोषणापत्र किंवा यास संलग्न अशा



कोणत्याही संलेखावर उक्त अधिनियमांतर्गत आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत पूर्णतः माफ करत असल्याचे शासन आदेशात म्हटले आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे खात्री पटत असल्याने हा निर्णय घेतला असल्याचे शासनाने ▶▶ पान २ वर

# बिनविरोध उमेदवारांची होणार चौकशी
# राज्य निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

**आगामी निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षांचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या पार्श्वभूमीवर, विरोधी पक्षांकडून झालेल्या गंभीर आरोपांची महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग (एसईसी) चौकशी करणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव, प्रलोभन किंवा जबरदस्तीचा वापर झाला का, याबाबत**




**आयोगाने संबंधित महानगरपालिकांकडून सविस्तर अहवाल मागवले आहेत.**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी होणार असून मतमोजणी १६ जानेवारीला होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० डिसेंबर होती. ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत भाजपचे पाच आणि शिवसेनेचे चार उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. भिवंडी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपली ताकद दाखवत सहा उमेदवार बिनविरोध निवडून आणले आहेत. पिंपरी-चिंचवड, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर येथेही किमान एक भाजप उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. राज्यात भाजप-महायुतीचेच सर्वाधिक उमदेवार बिनविरोध झाले असून एकट्या भाजपचे ३५ पेक्षा जास्त उमेदवार बिनविरोध ▶▶ पान २ वर

## 'एमपीएससी' विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून मनोज जरांगे आक्रमक

जालना । प्रतिनिधी

**पोलीस उपनिरीक्षक भरती परीक्षेसाठी वयोमर्यादा वाढवावी, अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून होत असतानाही राज्य सरकारने अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. या विलंबामुळे अस्वस्थ झालेल्या 'एमपीएससी'च्या विद्यार्थ्यांनी आक्रमक भूमिका घेतली असून पुण्यात आंदोलनाला सुरुवात झाली आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मनोज जरांगे पाटील पुण्यात दाखल झाले असून, त्यामुळे आंदोलनाला अधिक धार मिळाल्याचे चित्र आहे.**

या आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी थेट मुख्यमंत्री कार्यालयातील ओएसडीला फोन केला. तसेच विखे पाटील यांच्याशीही थेट संपर्क साधत



विद्यार्थ्यांचे प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी केली आहे. प्रश्न सुटला नाही तर लक्षात ठेवा, निवडणुका तोंडावर आहेत. महापालिकेच्या निवडणुका आहेत, असा थेट इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. तसेच जोपर्यंत विद्यार्थ्यांचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत मी इथून उठणार नाही. मी एकदा आंदोलनाला बसलो की ▶▶ पान २ वर

## सरकारच्या निर्णयाला तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचा विरोध

दिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकारने पानमसाला, सिगारेट्स, तंबाखू आणि तत्सम उत्पादनांवर ४० टक्के जीएसटी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. तर बिडीवर १८ टक्के जीएसटी लागू होईल. १ फेब्रुवारीपासून हे नवीन दर लागू होतील. याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. दरम्यान, सरकारच्या या निर्णयाविरोधात आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमधील तंबाखू उत्पादक रस्त्यावर उतरले आहेत. आमच्या उपजिविकेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल, अशी चिंता तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. ही करवाढ मागे घ्यावी, अशी मागणी करत शेतकऱ्यांनी शुक्रवारी विविध ठिकाणी रास्ता रोको, धरणे आंदोलने केली. अर्थ मंत्रालयाकडून, चघळण्याचा तंबाखू, जर्दा आणि गुटखा पॅकिंग ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रात केवळ 'मराठी'चीच 'सक्ती'

## साताऱ्याच्या साहित्य संमेलनात मुख्यमंत्री फडणवीसांची स्पष्टोक्ती

सातारा । प्रतिनिधी

महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठी भाषेचीच सक्ती आहे आणि तीच कायम राहील. परदेशी भाषांचे स्वागत करताना आपल्याच देशातील इतर भाषांना विरोध करणे योग्य नाही. सर्व भाषांचा सन्मान व्हावा, मात्र मातृभाषेचा दर्जा सर्वोच्च असला पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे केले. साताऱ्यात आयोजित ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते



झाले, त्यावेळी ते बोलत होते.

साहित्यातील राजकीय हस्तक्षेपावर भाष्य संमेलनाच्या व्यासपीठावरून बोलताना मुख्यमंत्र्यांनी भाषा, संस्कृती आणि राजकारण अशा विविध विषयांवर भाष्य केले. मावळत्या अध्यक्षांनी नव्या अध्यक्षांकडे सूत्रे सोपवण्याच्या प्रक्रियेचे कौतुक करताना ते मिश्किलपणे म्हणाले, साहित्य क्षेत्रात ज्याप्रमाणे आनंदाने पदभार सोपवला जातो, तसे राजकारणातही ▶▶ पान २ वर

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंना 'भारतरत्न' द्या

### साहित्य संमेलनात मागणी

सातारा । प्रतिनिधी

सातारा येथे सुरु झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी आपल्या भाषणातून सामाजिक आणि राजकीय विषयांवर भाष्य केले. बिघडलेले गाव सुधारण्यासाठी पाटील आणि कुलकर्ण्यांना युती करावीच लागते, ही जुनी वहिवाट आहे, असे विधान त्यांनी यावेळी केले. संमेलनाध्यक्षपदी एका शेतकऱ्याच्या मुलाची निवड केल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पाटील यांनी लोकशाहीर ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२ जानेवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १९.०० क्विंटल | २,४०० | २,८२६ | २,५९६ |
| ज्वारी/हायब्रिड : ४८.५० क्विंटल | २,८७० | ३,८१० | ३,२८३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १६.०० क्विंटल | ५,६०१ | ६,७०० | ६,३१७ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,००१ | ५,७५० | ४,८८४ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,४८१ | ३,१२० | २,९८४ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीन: १५७.०० क्विंटल | ४,५५१ | ४,७२१ | ४,६८१ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,३०० | ५,४१० | ४,९६५ |

# फास्टॅग वापरकर्त्यांना मोठा दिलासा!

## १ फेब्रुवारी २०२६ पासून 'केवायव्ही' प्रक्रिया होणार बंद

नवी दिल्ली। वृतसंस्था

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वाहनधारकांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. फास्टॅग खरेदी केल्यानंतर करावी लागणारी 'नो युवर व्हेईकल' ही अनिवार्य प्रक्रिया आता संपुष्टात येणार आहे. १ फेब्रुवारी २०२६ पासून जारी होणाऱ्या सर्व फास्टॅगसाठी आता स्वतंत्र केवायव्ही करण्याची गरज भासणार नाही.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, या सुधारणेमुळे लाखो रस्ते वापरकर्त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाहनधारकांकडे वैध कागदपत्रे असूनही, फास्टॅग कार्यान्वित केल्यानंतर केवायव्ही प्रक्रियेमुळे त्यांना नाहक मनस्ताप आणि विलंब सहन करावा लागत होता. नवीन निर्णयामुळे ही गैरसोय आता दूर होणार आहे. ज्या कारधारकांकडे आधीपासूनच ▶▶ पान २ वर

# 'ई-केवायसी'अभावी अखेर राज्यातील ६७ लाख लाडक्या बहिणी लाभापासून वंचित

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाकांक्षी ठरलेल्या ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक केले होते. मात्र, दिलेल्या मुदतीपर्यंत राज्यातील २ कोटी ४७ लाख महिलांपैकी १ कोटी ८० लाख महिलांनी ई-केवायसी केली तर तब्बल ६७ लाख महिलांनी ई-केवायसी न केल्यामुळे अखेर त्या आता लाडकी बहिणीच्या लाभापासून कायमच्या वंचित राहणार आहेत. ▶▶ पान २ वर



तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२४ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. सुरुवातीला तब्बल २ कोटी ६२ लाख अर्ज दाखल झाले होते. ▶▶ पान २ वर







cmyk

## अग्रलेख

# स्वार्थापोटी नैतिकतेचे धिंडवडे

सरकारी नोकरीवर जशा उड्या पडतात तशाच पक्षाच्या उमेदवारीसाठी पडल्याचे गेल्या काही दिवसांत दिसून आले आहे. राज्यातील एकोणतीस महानगरपालिकांची निवडणूक होणार आहे. यासाठी राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारीसाठी इच्छुक हातघाईवर आल्याचे प्रखरपणे दिसून आले. त्यासाठी साम-दाम-दंड-भेद याचा वापर करण्यात आला. सोलापुरात कार्यकर्त्यांची झालेलीर हत्या बरेच काही सांगून जाणारी आहे. पक्षासह किंवा पक्षाशिवाय निवडणूक लढवण्याची तयारी का दाखवतात? राजकारणातील अशी कोणती गोष्ट किंवा मुद्दा त्यांना तसे करण्यास भाग पाडत असावा? समाजकारणासाठी राजकारण करण्यासाठी हे सगळे सुरू असते असे जर लोकांना वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे. कारण समाजसेवेसाठी राजकारण करण्याचे दिवस सर्व पक्ष आणि त्यांच्या अर्ध्वयूंनी कधीच वळचणीला फेकून दिले आहेत. आजकाल त्यांची सामाजिकता फक्त निवडणुकीच्या काळातच ऊतू जाताना आढळते. त्यांच्या युवा संघटना फक्त याच काळात कार्यरत होतात. लोकांच्या पाया पडणे, त्यांच्या घरी चकरा मारणे, त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थिती लावणे आणि विविध कामांचा शुभारंभ करणे म्हणजेच समाजसेवा अशी नवपरंपरा सगळ्याच पक्षांनी रूढ केली आहे.

सक्रिय राजकारणात पडल्यावर आणि विशेषत: निवडून आलेल्यांच्या आर्थिक परिस्थितीत वेगाने होणारा बदल हे त्याचे एक प्रमुख कारण ठरू शकेल. कालपर्यंत दुचाकीवर फिरणारी व्यक्ती निवडून आल्यावर वर्षभरातच चारचाक्यांचा ताफा कसा बाळगते हे आता लोकांनाही वेगळे समजावून सांगावे लागत नाही. एकदा का सत्ताप्राप्ती झाली की समाजकल्याणाचे वारे डोक्यातून निघून जाते. मतदारांना दिलेली आश्वासने हवेत विरतात आणि सात पिढ्यांचे कोटकल्याण हाच एक अनेकांचा प्राधान्यक्रम बनलेला आढळतो. केवळ त्यांचीच नव्हे तर त्यांच्या बगलबच्च्यांचीदेखील आर्थिक परिस्थिती वेगाने पालटताना लोकांनाही दिसते. दुसऱ्या बाजूला सामान्य माणसे मरमर करतात. दोन वेळा हातातोंडाशी गाठ पडण्यासाठी दिवसाचे अनेक तास राब राब राबतात. तरीही प्रगतीचा प्र देखील अनेकांच्या अनुभवास येत नाही. त्यामुळे लोकनियुक्त सदस्यांना अशी कोणती जादूची कांडी सापडते की निवडून आल्यानंतर काही काळातच त्यांच्यात आणि सामान्य माणसांमध्ये सर्वप्रकारची दरी पडत जाते, असा प्रश्न लोकांना सतावतो. सक्रिय राजकारण म्हणजे हेच असा समजही खोलवर रुजतो. बरे, उमेदवारीसाठी आणि त्यामुळे होणाऱ्या तथाकथित सर्वांगीण प्रगतीसाठी कोणतीही विशेष पात्रता अजून तरी गरजेची नाही. पक्षही तशी अट घालत नाही. शैक्षणिक पात्रताही कोणी विचारत नाही. दुर्दैवाने अपात्र लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याचा कायदेशीर अधिकार मतदारांना नाही. आजकाल तर पक्षाच्या निष्ठेला पक्षच विचारेनासे झाले आहेत. त्यामुळे राजकारणात प्रसंगी लांड्यालबाड्या करून पक्षाची अधिकृत उमेदवारी मिळवा, निवडून या, अर्थबळ कमवा आणि त्याच्या पाठबळावर पक्षावर प्रभाव टाकत पुन:पुन्हा तिकीट मिळवा हा फंडा इच्छुकांना मोहात पाडतो आणि मग निवडणुकीच्या काळात सगळे नाट्य घडते. जसे सध्या घडते आहे. अर्थात सगळेच तसे नसतात. पण समाजकारणासाठी राजकारण करणाऱ्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच असू शकेल. या सगळ्यात मतदार मात्र हतबल होतात. निराश होतात. दैनंदिन आणि मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी झगडत राहतात. पाच वर्षांनी निवडणूक आली की, गपगुमान इमानेइतबारे मतदान करतात. ते तरी दुसरे काय करू शकतील? लोकशाही सार्थ ठरवण्याची जबाबदारी घटनेने त्यांच्यावरच सोपवली आहे ना.

# फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी व गट शिक्षण कार्यालय माजलगाव आयोजित

## ५३ वे तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न




**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी माजलगाव विद्यालयात दिनांक ३० व ३१ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेले तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व यशस्वीरीत्या संपन्न झाले.**

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन दि.३० डिसेंबर रोजी गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांच्या हस्ते करण्यात आले. तर अध्यक्षस्थानी महाराष्ट्र ग्रामीण बँक माजलगाव येथील शाखा व्यवस्थापक मनिष खंडारे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन पांडुरंग चांडक, गट शिक्षणाधिकारी कार्यालय विज्ञान विभाग प्रमुख लक्ष्मण पोटभरे,सचिन मोती,आयाज सिद्दीकी,प्रभाकर शेटे,बाबासाहेब परतूरकर, शेख अली भाई,शेख जमील पटेल,निळकंठ साबळे,गजेंद्र खोत,दत्ता कदम, विजय वैरागे,चैनलवाड सर,शेळके सर, सौ.माया चांडक यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनामध्ये तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपली वैज्ञानिक प्रतिभा सादर केली.प्रदर्शनात पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, हरित ऊर्जा, आरोग्य, कृषी तंत्रज्ञान, तसेच आधुनिक विज्ञानावर आधारित विविध नावीन्यपूर्ण प्रकल्प मांडण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रकल्पामागील वैज्ञानिक संकल्पना सहज व प्रभावीपणे समजावून सांगितल्याने उपस्थितांची विशेष प्रशंसा मिळाली. दि ३१ डिसेंबर रोजी या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे मान्यवरांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.समारोप प्रसंगी माजलगाव येथील नवनिर्वाचित नगराध्यक्ष मेहरीन शिफा बिलाल चाऊस,गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, लक्ष्मण पोटभरे, गणेश गटकळ,गणेश लाटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विजेत्या संघांचे अभिनंदन केले. या प्रदर्शनात प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक खोलेश्वर विदयालय यांनी मिळावला. यामध्ये विदयालयातील हजारे विराज भागवत व सृष्टीराज गणेशराव काळे हे विद्यार्थी सहभागी होते.द्वितीय क्रमांक माध्यमिक विद्यालय वारोळा यांनी मिळवला या मध्ये विद्यालयातील टोणपे ओंकार राधाकिसन हा विद्यार्थी सहभागी होते.तृतीय क्रमांक - जि. प. प्रा. शाळा पात्रूड येथील शाळेने मिळवला यामध्ये शेख हिना कौसर हे विद्यार्थी सहभागी होते. माध्यमिक गटातून गटातून प्रथम क्रमांक ईगलवूड इंग्लिश स्कूल फुलेपिंपळगाव यांनी मिळावला. यामध्ये विदयालयातील स्वराज हरिभाऊ जाधव व पृथ्वीराज दिनकर शेजूळ हे विद्यार्थी सहभागी होते. माध्यमिक गटातील द्वितीय क्रमांक मोरेश्वर विद्यालय माजलगाव यांनी मिळवला या मध्ये विद्यालयातील पवार शुभम अशोक व पोपळे लखन गोविंद हे विद्यार्थी सहभागी होते. तर तृतीय क्रमांक सिंधफणा पब्लिक स्कूल या शाळेने मिळवला यामध्ये ओजस अनिल कुलकर्णी व श्रीपाद भूषण मानधणे हे विद्यार्थी सहभागी होते.या सर्व विद्यार्थ्यांना सन्मान ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण परीक्षक म्हणून श्रीमती खान टी. एस,श्री.उंबरदंड पी. बी ,श्री.निंबाळकर ए. एच,श्रीमती - सोळंके एस. एच प्रयोगाचे बारकाईने परीक्षण करून उत्कृष्ट प्रकल्पांची निवड केली. समारोप प्रसंगी बोलताना माननीय रवींद्र महामुनी यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती विकसित होते,असे मत व्यक्त केले.या वेळी लक्ष्मण पोटभरे,प्रभाकर शेटे,गणेश गटकळ व विविध शाळेतील सहभागी विद्यार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी मुख्यध्यापिका सारिका बजाज मॅडम,ऐश्वर्या चांडक,उपमुख्यध्यापिका बनसोडे मॅडम, उपमुख्यध्यापक सचिन गायकवाड सर,रमेश बाहेती सर,विज्ञान विभाग प्रमुख बंडू पवार व शाळेतील शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन काकडे मॅडम,प्रास्ताविक गायकवाड सर व आभार बनसोडे मॅडम यांनी मानले.

# चिंचाळा जि.प.के.प्रा.शाळेत माजी विद्यार्थी पालक मेळावा संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथे शाळेच्या वतीने माजी विद्यार्थी आणि पालक मेळाव्याचे आयोजन शनिवारी २७ डिसेंबर रोजी करण्यात आले होते या कार्यक्रमाला चिंचाळा जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळेत जे विद्यार्थी शिकले आणि घडले असे विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने कार्यक्रमांना बोलावण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष बळीराम आजबे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख देशमुख सर हे होते. यावेळी शेळेचे माजी विद्यार्थी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप



प्रज्वलन करण्यात आले विद्यार्थ्यांनी सादर स्वागत गीत सादर केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला माजी विद्यार्थी तसेच काही पालकांनीही शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला शाळेचे विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते.या कार्यक्रमाला

बळीराम अजबे, श्रीराम खटावकर, सोमनाथ खताळ,देशमुख सर,गांडगे सर,सुभाष अजबे, लक्ष्मण मुंडे,ॲड मॅचिंद डोगरदिवे,ॲड मुकुंद जोशी,सुशांत काळे,विनायक राऊत,आसाराम खटावकर,बाबासाहेब डावरे संदीप खटावकर, बकट काळे,विक्रम कोळपे अश्विनकुमार डावरेसर,सय्यद मोबिन,विष्णुपंत नेमाटे,सचिन अजबे,माऊली अजबे,,गणेश कोळपे,दत्ता आवाड, आसेफ सय्यद, लक्ष्मण शिंगाडे,पप्पू अजबे,गोविंद शिंगाडे,राजेंद्र चाळक,सर्जेराव जाधव,नॅनोबा जाधव, त्रिंबक पायके,चव्हाण सर,शिंदे सर,भारत राठोड,आडे सर,लिगस्कर सर,हे उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप चाळक उपाध्यक्ष संदीप माने यांनी व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली होती.



**माजलगाव : बीड जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांनी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिति कार्यालयास भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे,उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे, संचालक दत्ता (काका) डाके, सहाय्यक निबंधक सुरज जगदाळे, सहा.सचिव रवींद्र नाईकनवरे, लेखापाल उद्धव फपाळ,जयराम कांबळे**

## पान ६ वरून...

### क्षीरसागर मुक्तीचा नारा देणाऱ्यांचे घोडे

नक्की आहे. शेवटी क्षीरसागर मुक्त नगरपालिका करणाऱ्यांचे घोडे आगामी काळात क्षीरसागरांमुळेच अडणार आहे. आगामी काळात नगरपालिकेचा कारभार व्यवस्थित करायचा असेल तर कुठल्यातरी एका क्षीरसागराला सोबत घ्यावे लागेल आणि यासाठी त्यांच्या काही अटी मान्य कराव्या लागतील. भविष्यात क्षीरसागर उपाध्यक्ष पदाची मागणी ही करू शकतात. किंवा स्थायी समिती ही मागू शकतात. शेवटी बीड नगरपालिकेमध्ये क्षीरसागरां शिवाय पर्याय नाही हे आता स्पष्ट झाले आहे.

---------------

### दोन धारदार तलवारींसह

येथे भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी वैशाली पवार, उपनिरीक्षक प्रतिभा पठाडे, कॉन्स्टेबल चव्हाण, माळी, पवार, मंडलीक, गोपनीय शाखेचे महेश तोटे,व चालक जाटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

-----------

### बालाघाटाच्या कुशीत

रुपयांचे बक्षिसे याप्रसंगी कांदेवाडी ग्रामस्थांच्या माध्यमातून विजयी पहिलवानांना बक्षिसी दिली जाते. गुरुवारी सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत थरारक कुस्त्यांचे डाव या दंगलीत रंगल्याने प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले गेले.उद्घाटक माधव निर्मळ,निखिल मुंडे,सपोनि महादेव ढाकणे, महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान,बिट्टू मुंडे,सोपान चाटे,वस्ताद रामभाऊ सोळंके यांच्या शुभहस्ते फडाची सुरूवात करण्यात आली.स्व.सुलोचना बलभीमराव खाडे स्मृती पुरस्कार्थ गणेश खाडे यांच्या वतीने अंतिम लढतीसाठी चांदीची गदा व रोख ८ हजार रुपये बक्षीस ठरवण्यात आले होते.हि लढत चाटगावच्या हरी गोरे यांची जीवाचीवाडी येथील महाराष्ट्र स्तरावर कुस्ती खेळणाऱ्या बाळनाथ चौरे याच्यासोबत चुरशीची झाली. सात मिनिटात बाळनाथ चौरे ने दोनदा टाकलेला डाव हरी गोरेंनी अखेर उधळून लावला. पंचाच्या निर्णयाने कुस्ती अनिर्णित थांबवण्यात आली. दोघांना समसमान बक्षीसाचे वाटप करण्यात आले. पहेलवान महादेव मुजमुले व अंकुश बडे यांनी पहाडी आवाजात सामन्यांचे निवेदन केले.

---------------

### गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ

मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. पीएच.डी. पदवी प्राप्त करणे ही कोणत्याही शिक्षकासाठी केवळ वैयक्तिक उपलब्धी नसून ती संपूर्ण संस्थेसाठी गौरवाची बाब असते. प्रा. डॉ. अमित बिंदू यांची ही यशोगाथा गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीसह संपूर्ण शिक्षणक्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. डॉ. अमित बिंदू यांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे असे प्रतिपादन गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष डॉ यशवंत राजेभोसले यांनी कौतुक सोहळ्यात केले. या प्रसंगी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट परिवाराने प्रा. डॉ. अमित बिंदू यांना हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक, संशोधनात्मक वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांचे हे यश भविष्यातील अनेक विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नवी दिशा व प्रेरणा देणारे ठरेल, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.

-----------------

### अनादरीत धनादेशा प्रकर्णी आरोपीस

साहेब बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्रमांक. १८४३/२३ सुनील विरुद्ध पंचफुला असे प्रकरण दाखल केले सदर प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने गुणदोषावर प्रकरण चालून सदर प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपी पंचफुला मधुकर जगताप, यांना दहा लाख रुपये दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी भक्कम बाजू मांडली, त्यांना ॲड. विशाल विलासराव कदम,ॲड. अभिषेक बहिर,ॲड. माऊली डाके ॲड. राजकुमार धरणे,ॲड. मुकुंद लोणकर ॲड. प्रदीप दराडे ॲड. विजय डोके,ॲड. अमोल तिडके,ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.

-------------

### जिल्हास्तरीय लोकशाही

सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

--------

### इंडियन मेडिकल असोसिएशन

मेडिकल असोसिएशनचे सहसचिव व गेल्या तीन वर्षांपासून सांस्कृतिक समितीचे अध्यक्षपद भूषविणारे डॉ.राजेश इंगोले यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर निवड अत्यंत महत्त्वाची मानली जाते. यावेळी महाराष्ट्र राज्य आयएमएचे आभार मानताना डॉ.राजेश इंगोले यांनी संघटनेमध्ये आतापर्यंत जी जी पदे मिळाली त्या पदांचा उपयोग संघटनेचे विचार रूजविण्यासाठी केला आहे. यापुढेही प्रत्येक पदाचा उपयोग डॉक्टरांच्या व रूग्णांच्या हितासाठी, संघटनेला बळकट करण्यासाठी करीत राहील असे मत व्यक्त केले. मिळालेले पद ही एक संधी समजून मी काम करीत राहतो, म्हणून संघटना मला वेगवेगळ्या संधी देते त्याबद्दल संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मी आभार मानतो. अंबाजोगाई सारख्या छोट्याशा ब्रँच मधून मला महाराष्ट्रभर कार्य करण्याची संधी मिळाली आणि आता राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची ही संधी मिळालेली आहे यामुळे मला नवीन ऊर्जा मिळालेली आहे असे प्रतिपादन केले. डॉ.राजेश इंगोले यांच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ.विक्रांत देसाई, डॉ.संतोष कदम, डॉ.अनिल आवाडे, डॉ.राजीव अग्रवाल, डॉ.रवींद्र कुटे, डॉ.मंजुषा गिरी, डॉ.आशा शितोळे, डॉ.कांचन मदार, डॉ.अब्दुल जबिले, डॉ.अनिल पाचनेकर, डॉ.राजेंद्र कुलकर्णी, डॉ.अशोक तांबे, डॉ.रवी वानखेडकर, डॉ.गीतांजली शर्मा, डॉ.संजय पाटील, डॉ.राजू वारी, डॉ.मोहिनी गान, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.रमेश भराटे, डॉ.पल्लवी दोडके, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.राहुल धाकडे, डॉ.विजय लाड, डॉ.बळीराम गित्ते, डॉ.तुकाराम मुंडे यांनी स्वागत केले. डॉ.राजेश इंगोले यांच्या या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल अंबाजोगाईतील त्यांचा मित्रपरिवार, आप्तेष्ट आणि हितचिंतकांनी आनंद व्यक्त करीत त्यांना शुभेच्छा दिल्या.

------------------

### संत-महंत,भाविकांच्या स्वागतासाठी

सोहळा असल्यामुळे गावकऱ्यांच्या वतीने भव्य दिव्य स्वरूपाचे असे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. आज फुलसांगवी येथे या सुवर्ण महोत्सव सोहळ्याची पुष्पवृष्टी असल्याने फुलसांगवीमध्ये महंत जनार्दन महाराज यांच्यासह पंचक्रोशीतील संत-महंत भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभणार आहे. या संत-महंत भाविक भक्तांच्या स्वागतासाठी फुलसांगवीकरांच्यावतीने शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये व ढोल ताशांच्या पथकासह, कलशधारी महिला, भजनी मंडळ, विविध वाद्याची पथके, त्याचबरोबर शालेय विद्यार्थ्यांची विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम पार पडणार आहेत यामुळे यावर्षीचा पुष्पवृष्टीचा कार्यक्रम भव्य दिव्य आनंदोत्सव असणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सप्ताह सोहळ्यातील कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

-------------

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या २ लाखांपर्यंतच्या

म्हटले आहे. याआधी राज्यात सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागत असलेले ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्कही माफ करण्यात आले होते. या निर्णयाचा फायदा दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसह कोट्यवधी नागरिकांनाही झाला आहे. आताच्या शासनाच्या निर्णयाने शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

---------------

### 'एमपीएससी' विद्यार्थ्यांच्या

प्रश्न सुटतोच, असा ठाम निर्धार देखील मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे. पोलिसाला उचलून न्यायला लावणे एवढे सोपे आहे का? तुम्हाला बघायचे आहे का? तुम्हाला सगळे पुण्यात दिसतील. महाराष्ट्रातले अख्खे पुण्यात मग पुणे जाम करायचे का? असे देखील मनोज जरांगे यावेळी म्हणाले. पुण्यात एमपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मध्यरात्री १.१३ वाजता आंदोलन सुरू केले.

--------------

### बिनविरोध उमेदवारांची होणार चौकशी

झाले आहेत. त्यामध्ये, ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल आणि भिंवडीत भाजपचे अनेक उमेदवार बिनविरोध झाल्याने भाजप समर्थकांनी विजयी जल्लोष केला आहे. या अनुषंगाने विरोधकांकडून वेगवेगळे आरोप करण्यात येऊ लागले आहेत. यामुळेच या बिनविरोध निवडणून आलेल्या उमेदवारांची चौकशी होणार आहे. आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, संबंधित प्रभागांतील निवडणूक अधिकारी, महानगरपालिका आयुक्त (निवडणूक प्रभारी) आणि पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागवले जातील. हे अहवाल प्राप्त होईपर्यंत बिनविरोध निवडीची अधिकृत घोषणा करण्यास निवडणूक अधिकाऱ्यांना परवानगी दिली जाणार नाही. काँग्रेस, जनता दल (एस) आणि आम आदमी पक्षाने मुंबईतील कुलाबा येथील काही प्रभागांमध्ये उमेदवारांना दबावाखाली बेकायदेशीररीत्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून रोखल्याचा आरोप केला आहे.

**उमेदवारांनी अर्ज मागे घ्यावा म्हणून निवडणूक अधिकाऱ्यांचा दबाव - संजय राऊत**

आगामी महापालिका निवडणुकांसाठी विविध पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. मात्र उमेदवारांनी अर्ज मागे घ्यावा, माघार घ्यावी म्हणून निवडणूक अधिकारी विरोधी पक्षाच्या उमेदवारांना धमक्या देत आहेत, असा आरोप शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला. त्यांच्यावर प्रत्येक ठिकाणी संबंधित पालकमंत्र्यांचा दबाव आहे, हे किती काळ चालणार ? ही लोकशाही आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उपमुख्यमंत्री (शिंदे) यांच्या निवासस्थानाच्या बाहेर सरकारी अधिकाऱ्यांच्या गाड्यांचा ताफा उभा होता, त्यामध्ये काही आर.ओ. होते. आचारसंहिता लागू आहे ना, मग अधिकाऱ्यांनी आचारसंहितेचे पालन स्वत: केले नाही तर ते उमेदवारांना आणि जनतेला कोणत्या आधारावर सांगतात की आचारसंहितेचे पालन करा? असा थेट सवाल राऊत यांनी विचारला आहे.

---------

### लोकशाहीर अण्णाभाऊ

अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर 'भारतरत्न' देण्याची आग्रही मागणी केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील साहित्यिकांचे योगदान अधोरेखित करताना त्यांनी कवी मजरूह सुलतानपुरी आणि आचार्य अत्रे यांच्या संघर्षाचे दाखले दिले. राजकारण्यांची आचारसंहिता अल्पकाळ असते, मात्र साहित्यिकांची 'विचारसंहिता' पिढ्यानपिढ्या दिशा देण्याचे काम करते, अशा शब्दांत त्यांनी सत्तेला साहित्याची ताकद दाखवून दिली.

-------------

### महाराष्ट्रात केवळ

झाले तर किती चांगले होईल. मी मुख्यमंत्री असेपर्यंत साहित्यात कोणताही राजकीय हस्तक्षेप होणार नाही. साहित्यिकांनी राजकारणात जरूर यावे, पण साहित्यात राजकारण आणू नये. मराठीला मिळालेल्या अभिजात भाषेच्या दर्जाबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी मराठीचा संघर्ष समजून घेतला आणि तिला राजमान्यता दिली. आता ही भाषा जगभरात पोहोचवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. 'त्रिभाषा सूत्रा'बाबत स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की, पहिलीपासून भाषा सक्तीबाबत डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती अहवाल सादर करेल, त्यानंतर योग्य निर्णय घेतला जाईल. मात्र, इंग्रजी, फ्रेंच किंवा स्पॅनिश यांसारख्या परदेशी भाषांचे कौतुक करताना भारतीय भाषांविषयी दुजाभाव ठेवू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. साताऱ्याच्या भूमीचे कौतुक करताना मुख्यमंत्री म्हणाले की, सातारा हा केवळ भौगोलिक प्रदेश नसून विचारांचा संगम आहे. साताऱ्याने आजवर सर्वाधिक १७ संमेलनाध्यक्ष दिले आहेत. ५० वर्षांपूर्वी आणीबाणीच्या काळात दुर्गाबाई भागवत यांनी याच भूमीतून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा जो हुंकार दिला होता, त्याची आठवण करून देत त्यांनी संविधानाच्या मजबूतीवर विश्वास व्यक्त केला. ''जोवर चंद्र-सूर्य आहेत, तोवर मराठीचा अभिमान कायम राहील,'' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी मावळत्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी नूतन अध्यक्ष विश्वास पाटील यांच्याकडे संमेलनाची सूत्रे सुपूर्द केली. या सोहळ्याला साहित्यातील दिग्गज आणि मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

------------

### सरकारच्या निर्णयाला तंबाखू

मशिन्स (क्षमता निर्धारण आणि शुल्क संकलन) नियम, २०२६ देखील अधिसूचित करण्यात आले आहेत. हे नियम चघळण्याचा तंबाखू आणि तत्सम उत्पादनांच्या उत्पादकांची उत्पादन क्षमता निश्चित करणे आणि शुल्क लागू करण्यासाठी रूपरेषा निश्चित करतात. डिसेंबरमध्ये संसदेत दोन विधेयके मंजूर करण्यात आली होती. त्यात पान मसाला उत्पादनावर नवीन उपकर आणि तंबाखू उत्पादनांवर उत्पादन शुल्क लागू करण्याच्या तरतुदीचा समावेश होता. दरम्यान, सरकारच्या या निर्णयाविरोधात आंध्र प्रदेशच्या विविध जिल्ह्यांतील हजारो तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. ही अतिरिक्त करवाढ मागे घ्यावी आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे रक्षण करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. यासाठी आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमधील विविध भागात शेतकऱ्यांनी रास्ता रोको, धरणे आंदालने आणि मोर्चे काढले. तंबाखूजन्य पदार्थांवरील करवाढीमुळे देशांतर्गत उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांचे दर वाढवावे लागतील. परिणामी विक्रीत घट होईल आणि थेट फटका उत्पादक शेतकऱ्यांना बसेल, अशी चिंता फेडरेशन ऑफ ऑल इंडिया फार्मर असोसिएशनने व्यक्त केली आहे.

-------------

### 'ई-केवायसी'अभावी अखेर

मात्र, छाननीमध्ये अनेक त्रुटी समोर आल्या. गेल्या दीड वर्षांपासून राज्यातील सुमारे २ कोटी महिला या लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत आहेत. राज्यसरकारने जाहीर केलेल्या या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात दर महीना १५०० रुपये जमा होता. मात्र ऑक्टोबरमध्ये पैसे मिळाल्यानंतर नोव्हेंबर सरला, डिसेंबर संपला तरी लाडक्या बहिणींना पैसे मिळाले नव्हते. त्यांना नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी असे तीन महिन्याचे एकत्र १५०० रुपये मिळतील अशाही बातम्या समोर येत होत्या, मात्र हे पैसे खात्यात कधी जमा होणार याची काही अधिकृत माहिती समोर आली नव्हती. दरम्यान, लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आले होते. त्याची मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच होती. खरंतर नोव्हेंबरपर्यंतच ई-केवायसीची मुदत होती, मात्र लाखो महिलांचे ई-केवायसी न झाल्याने ही मुदत वाढवण्यात आली होती. लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थी वगळण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून ईकेवायसी बंधनकारक करण्यात आले होते. आधी ईकेवायसीची मुदत १८ नोव्हेंबरपर्यंत होती, मग ती वाढवून ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. पण त्यानंतरही अनेक महिलांना ई-केवायसी करण्याच अडचणी आल्याने ही मुदत वर्षाअखेरीस, ३१ डिसेंबपर्यंत वाढवण्यात आली. काल अखेर ही मुदत संपली. त्यामुळे आता ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, त्यानंच या योजनेचा लाभ आणि पर्यायाने दरमहा १५०० रुपये मिळणार आहेत. उर्वरित महिलांना या योजनेला मुकावे लागणार आहे.

-----------

### फास्टॅग वापरकर्त्यांना

फास्टॅग आहेत, त्यांच्यासाठी आता नियमितपणे केवायव्ही करणे अनिवार्य राहणार नाही. प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे की, केवळ विशेष तक्रारींच्या प्रकरणांमध्येच (उदा. फास्टॅगचा गैरवापर, चुकीच्या पद्धतीने जारी करणे किंवा तांत्रिक समस्या) केवायव्ही ची आवश्यकता भासेल. अन्यथा, कोणत्याही तक्रारीशिवाय सुरू असलेल्या सध्याच्या फास्टॅगसाठी ही प्रक्रिया करण्याची गरज उरणार नाही.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.३ जानेवारी २०२६


## कडा सहकारी साखर कारखाना सुरू करण्याची इच्छा

आष्टी: कडा सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू व्हावा, ही इच्छा आमचीही आहे. मात्र माजी आमदार धोंडे साहेबांचा खरा डाव वेगळाच असून त्यांना या कारखान्याची मौल्यवान जमीन हडप करायची असल्याचा गंभीर आरोप कामगार पुत्र प्रताप थोरवे यांनी केला आहे. कडा साखर कारखानातील कर्मचारी थकीत वेतन मागणीसाठी सर्व कर्मचारी यांची शुक्रवार (दि.२) रोजी सकाळी ११ वा.आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत कामगार पुत्र प्रताप बाळासाहेब थोरवे बोलत होते. पुढे बोलतांना थोरवे यांनी सांगितले की, कारखाना सुरू करण्याच्या नावाखाली दिशाभूल केली जात असून, प्रत्यक्षात कारखान्याच्या मालमत्तेवर डोळा ठेवण्यात आला आहे. याशिवाय या कारखान्यासाठी आवश्यक असलेला निधी सर्व नियम धाब्यावर बसवून महेश मल्टीस्टेट पतसंस्थेकडून उभारण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला.

# लग्न लावून लाखोंची फसवणूक करणारी टोळी उघड

## अंमळनेर पोलिसांची धडक कारवाई

अंमळनेर। प्रतिनिधी

लग्नासाठी मुलगी आहे, असे सांगून तरुणांकडून लाखो रुपये उकळून नवरी पसार करणाऱ्या टोळीचा अंमळनेर पोलिसांनी पर्दाफास केला आहे. या प्रकरणी बनावट नवरीसह दोन महिलांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



संजय शामराव पवार (वय ३४, रा. गंडाळवाडी, ता. पाटोदा, जि. बीड) यांची १० डिसेंबर २०२५ रोजी दत्ता पंढरीनाथ पवार (रा. सुपा, ता. पाटोदा) व पोपट फकीरा पठाण (रा. वाघळुज, ता. आष्टी) यांनी ओळख करून देत ''लग्नासाठी मुलगी आहे'' असे सांगितले. त्यांच्या साथीदार सुमन साळवे (रा. पंढरपूर), जयश्री संजय भालेराव उर्फ जयश्री रवी शिंदे (रा. आंबेडकर चौक, छत्रपती संभाजीनगर) व बनावट नवरी रूपाली बाळू दिशागंज (वय २८, रा. विनायक कॉलनी, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर) यांनी संगनमत करून संजय पवार यांच्याकडून तब्बल ४ लाख रुपये रोख घेतले.ङ्गयानंतर रूपाली हिचे संजय पवार यांच्याशी लग्न लावून देण्यात आले. लग्नानंतर अवघ्या चार दिवस ती सासरी राहिली व १७ डिसेंबर २०२५ रोजी अंगावरील दागिने घेऊन घरातून पसार झाली. अनेक दिवस शोध घेऊनही ती न सापडल्याने संजय पवार यांनी रूपालीची मावशी असल्याचा बनाव करणाऱ्या जयश्री शिंदे व एजंट सुमन साळवे यांच्याशी संपर्क साधला असता, ''ती परत येणार नाही, पुन्हा फोन केलास तर बलात्काराचा गुन्हा दाखल करू'' अशी धमकी देण्यात आली. या प्रकाराने त्रस्त झालेल्या संजय पवार यांनी अंमळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ व पोलीस कॉन्स्टेबल योगेश बहिरवाळ यांनी तांत्रिक तपास करत मोबाईल सीडीआरच्या आधारे आरोपींचा माग काढला. त्यानुसार ३१ डिसेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सिडको मुकुंदवाडी परिसरातून बनावट नवरी रूपाली दिशागंज व जयश्री भालेराव (शिंदे) यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. दोघींना १ जानेवारी २०२६ रोजी पाटोदा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. सध्या या महिलांकडून इतर फसवणूक प्रकरणांची माहिती मिळते का, याबाबत तपास सुरू असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल योगेश बहिरवाळ, सतीश तरटे, श्याम खाडे, महिला पोलीस अंमलदार शीतल काकडे, छाया सापते, वैशाली चव्हाण व होमगार्ड दिलीप घोषीर करीत आहेत.

## सराईत गुन्हेगार अखेर गजाआड ; लोहमार्ग पोलिसांची मोठी कारवाई



परळी । प्रतिनिधी

अनेक दिवसापासून रेल्वे गाडीत प्रवाशांच्या मोबाईल, दागिन्यांवर डल्ला मारणारे सराईत गुन्हेगार यांना अखेर रेल्वे पोलीस परळी पथकाने मोठ्या शर्तीने तांत्रिक तपास करून व गुप्त माहितगार यांच्या मदतीने ताब्यात घेतले आहे.

परळी रेल्वे पोलीस गु. र. न.९५/०२५,९७/०२५, ९८/०२५ कलम ३०५ २०२३ कायद्याअंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्यातील एकूण ३ लाख ६७ हजार ८०० रुपयाचा सोन्याचा व मोबाईल, कॅश पैशाचा मुद्देमालासह पोलिसांनी चोरांकडून जप्त केला करत नांदेड लोहमार्ग, परभणी, छ. संभाजीनगर परिसरात ही अनेक गुन्ह्यातील पाहिजे असलेले गुन्हेगार बाबासाहेब रुस्तुम बोर्डे रा.जालना, गजानन धोंडीराम कुसळे रा. वसमत हिंगोली, संदीप नामदेव घुले रा.परतूर जालना हे अनेक दिवसापासून रेल्वे मध्ये चोऱ्या करत असल्याने अनेक दिवसापासून त्यांचा शोध विविध पथकाकडून सुरू असताना परळी रेल्वे पोलीस यांनी पोलीस अधीक्षक स्वाती भोर लोहमार्ग छ.संभाजीनगर. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संजय लोहकरे, यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघमोडे यांच्यासह त्यांच्या तपास पथकातील स,पो,उपनि. मेलफेदेवार, पो, हवा. महादेव पवार सिराज पठाण, स्थानिक गुन्हे शाखा पथकातील,अनंत कांबळे, कोंडीराम सातपुते, नागोराव घोडके, गजानन टिमकीकर, काकासाहेब सुतार, अभिलाष गोरे, चंद्रकांत कान्हेरकर यांनी मोठी कार्यवाही करत गुन्हेगारावर आळा घालण्यात मोठे यश मिळाल्याचे सांगून वरिष्ठांकडून व प्रवासी यांच्याकडून परळी लोहमार्ग पोलीस यांचे कौतुक होत आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात रुई-पिंपळा ग्रामपंचायतचा सक्रिय सहभाग

### विविध उपक्रमाचे सरपंच मयूर आंधळे यांच्या हस्ते उद्घाटन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील रुई- पिंपळा ग्रामपंचायतने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ मध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदवला आहे. या अभियानाच्या विविध उपक्रमाचे उद्घाटन गावचे युवा सरपंच मयूर आंधळे यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामपंचायतच्या पुढाकाराने गावातील विविध सामाजिक आर्थिक पर्यावरणीय उपक्रम राबविण्यात आले आहेत त्यापैकी महत्त्वाचे उपक्रम पुढील प्रमाणे आहेत महिला आरोग्य आणि जनजागृती शिबिर गावातील महिला घटकांसाठी अमोनिया मुक्त करण्यासाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले गेले. या शिबिरात सर्व



महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना आरोग्याबाबत मार्गदर्शन केले गेले, गावातील जेष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले व रुग्णांना आवश्यक गोळा,औषध मोफत प्रदान केले गेले. ग्रामपंचायत कार्यालयाद्वारे कापडी पिशव्यांचे वितरण करून प्लास्टिक मुक्त गाव करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यात आली. स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून गावात स्वच्छता राखण्यासाठी विविध उपक्रम राबवले गेले आणि ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. या प्रकारे रुई-पिंपळा ग्रामपंचायतने समाजातील सर्व घटवनचा समावेश करून सामाजिक व पर्यावरणीय सुधारणा साधण्याचा प्रयत्न केला आहे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीसाठी पारितोषिक ठरवण्यात आली आहे, त्या अनुसार तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक येणाऱ्या ग्रामपंचायतींना कोट्यावधी रुपयांची आर्थिक बक्षिसे प्रदान केले जाणार आहेत. ग्रामपंचायतच्या या उपक्रमामुळे गावातील नागरिकांच्या जीवनामध्ये सुधारणा होण्यास तसेच सामाजिक आणि पर्यावरणीय जनजागृतीला चालना मिळत आहे. युवा सरपंच मयूर आंधळे यांच्या नेतृत्वाखाली रुई-पिंपळा ग्रामपंचायतने या अभियानात उत्कृष्ट योगदान दिले असून, गावाचे नाव राज्यस्तरीय मानांकनात समोर येण्यास मदत झाली आहे.

## श्री दत्त संस्थान बालाघाट येथे पौर्णिमा उत्सवाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथील श्री दत्त संस्थान बालाघाट येथे पौष शुद्ध पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी भव्य धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव प.पु.ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. पौष शुद्ध पौर्णिमा हा दत्तभक्तांसाठी अत्यंत पवित्र व महत्त्वाचा दिवस मानला जात असून, यानिमित्त दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक बालाघाट येथे दर्शनासाठी उपस्थित राहतात.

उत्सवानिमित्त सकाळपासून अभिषेक, पूजा-अर्चा, धार्मिक विधी व भजन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, या महाप्रसादासाठी जगन्नाथ दगडू शिंदे (कपिलधारवाडी, छ. संभाजीनगर) व गोरख देवराव शिंदे (कपिलधारवाडी) हे अन्नदाते म्हणून लाभ घेणार आहेत. या पावन प्रसंगी पंचक्रोशीतील तसेच परिसरातील सर्व दत्तभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे



आवाहन श्री दत्त संस्थान बालाघाट यांच्या वतीने करण्यात आले आहे. बालाघाट येथील श्री दत्त मंदिर हे परिसरातील श्रद्धेचे प्रमुख केंद्र असून येथे सातत्याने होणाऱ्या धार्मिक उपक्रमांमुळे भाविकांमध्ये भक्तीभाव अधिक दृढ होत आहे. भाविकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता, भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात धार्मिक उत्सव, सेवा उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे संस्थानच्या वतीने सांगण्यात आले. या सर्व उपक्रमांना प.पु.ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांचे आशीर्वाद लाभत असून, दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचा धार्मिक व सामाजिक कार्याचा विस्तार होत आहे. यापुढील प्रत्येक शुद्ध पौर्णिमेला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दत्तसेवेचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## पाटोदा नगरपंचायत वार्ड क्रमांक ६ मध्ये रस्ता व नाली दुरुस्तीचा प्रश्न गंभीर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक ६ मध्ये रस्ता व नाल्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याने परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात स्थानिक रहिवासी विजय विष्णू गर्जे यांनी पाटोदा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर करून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित भागातील रस्ता व नाल्या अनेक दिवसांपासून खराब अवस्थेत असून पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्यामुळे रस्त्याची अधिकच दुरवस्था झाली आहे. पाणी साचत राहिल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नाल्यांमधील घाण व साचलेल्या पाण्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. परिणामी डासांचा प्रादुर्भाव वाढून आजारांचा धोका निर्माण झाला आहे.ङ्गविशेषतः लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना ये-जा करताना मोठ्या



अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वेळा प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतरही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, अशी नाराजी स्थानिक नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.ङ्गया गंभीर समस्येची तात्काळ दखल घेऊन रस्ता व नाल्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि जनजागृतीसाठी पाटोदा बस आगारात सुरक्षितता अभियानाचे उद्‌घाटन

पाटोदा । प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी पाटोदा बस आगारात सुरक्षितता अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बस आगार व्यवस्थापक संतोष डोके, सहाय्यक वाहतूक अधीक्षक विकास खेडकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून सौताडा हायस्कूलचे बाळासाहेब दहिफळे सर, जरेवाडी येथील आदर्श शाळेचे प्रवीण काळूसे, तांबाराजुरी हायस्कूलचे रामदास निंगुळे, समाजसेवी कार्यकर्ते दत्ता भाऊ देशमाने उपस्थित होते.





या अभियानाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे दहिफळे, निंगुळे, दत्ता देशमाने आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष आगार व्यवस्थापक डोके यांनी सुरक्षित अभियानाचे महत्व व गरज, वाढत्या अपघातांची कारणे आणि उपाय, बसचालकांचे आरोग्य व प्रवाशांची सुरक्षितता, बसचालक व वाहकांची जबाबदारी, भुमिका व अडचणी, बसप्रवाशांचे अपेक्षित सहकार्य व जागृती, एसटी महामंडळातील शासकीय योजनांचे प्रवाशी व संबंधित अडचणी तसेच रस्त्यांवरील इतर वाहनचालकांनी वाहतूकीचे नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याविषयी जनजागृती करणे अशा विविध विषयांवर सविस्तर माहिती दिली. या अभियानाच्या माध्यमातून एस टी महामंडळातील चालक, वाहक आणि सर्वच कर्मचाऱ्यांना मोठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळाले. या अभियानाच्या उद्धाटनाच्या वेळी बस आगारातील कार्यालयातील सर्व कर्मचारी, डेपोमधील सर्व मॅकेनिकल, बसचे चालक व वाहक आणि प्रवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सुरक्षितता अभियान उद्घघाटनाचे नियोजन कार्यालयीन कर्मचारी प्रकाश तांबे, महादेव नाईकवाडे दादा आणि इतरांनी चांगले केले होते.

## स्वखर्चातून लोकसेवेचा उपक्रम मोरगाव-जाधववस्ती रस्ता झाला सुलभ

### निधीअभावी जनतेचे हाल होऊ देणार नाही राजेंद्र मस्के

बीड। प्रतिनिधी

पाटोदा-मांजरसुंभा मुख्य रस्त्यावरील मोरगाव ग्रामपंचायती अंतर्गत जाधववस्तीला जोडणाऱ्या रस्त्यावर आठ नळ्यांच्या नळकांडी पुलाच्या कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी वामन जाधव, तुकाराम कागदे, आण्णासाहेब कागदे, सचिन जाधव, मजूर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ, गणपत जाधव, भारत जाधव, बाबासाहेब काकडे, दादाहरी काकडे, सयाजी काकडे, गोविंद काकडे, बाबुराव कागदे, अतुल जाधव, बाबासाहेब जाधव, विश्वंभर जाधव, सतीश जाधव, बाळू जाधव, संतराम कागदे, अशोक कागदे, उद्धव जाधव, राजेंद्र वामने आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

मोरगाव ग्रामपंचायत०अंतर्गत साधारण अडीचशे लोकसंख्येची जाधववस्ती मांजरसुंभा-पाटोदा महामार्गा लगत आहे. मांजसुंबा पाटोदा



महामार्ग रस्त्याची उंची वाढल्याने वस्तीला जाणारा रस्ता खड्डा व उताराचे अवघड बनला आहे .त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचून वाहतुकीसाठी ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत होती. मागील अतिवृष्टीमध्ये वस्तीच्या चहुबाजूने पाणी साचल्याने नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागला होता. या परिस्थितीवर तोडगा म्हणून राजेंद्र मस्के यांनी स्वखर्चातून ६ फूट रुंद आणि १० फूट लांबीच्या आठ नळ्यांचा मजबूत नळकांडी पूल बांधण्याचे काम हाती घेतले आहे. ''जाधववस्तीवरील लोकांना रस्त्याअभावी हाल होऊ नयेत म्हणून हे काम मी स्वखर्चातून सुरू केले आहे. मंजुरी किंवा निधीअभावी जनतेचे प्रश्न प्रलंबित राहू नयेत, हेच माझे उद्दिष्ट आहे,'' असे मत जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी यावेळी व्यक्त केले. त्यांनी पुढे सांगितले की, ''ग्रामस्थांची मागणी आपण जिल्हा प्रशासनाकडे केली होती, मात्र निधी न मिळाल्याने स्वखर्चातून हे काम करून ग्रामस्थांची गैरसोय दूर करत आहोत. या उपक्रमामुळे मोरगाव-जाधववस्ती दरम्यानचा रस्ता सुलभ झाला असून, नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावत असलेली समस्या संपुष्टात आली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी राजेंद्र मस्के यांच्या लोकाभिमुख कार्याचे कौतुक करत त्यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.

## जाहीर प्रगटन

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

npghansawangi@gmail.com

PHno02483-271787

जा.क्रं.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- २५४२
दिनांक: २१/१२/२०२५

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार राहुल भरतराव काळे रा. कारला ता.जि. जालना यांनी नामे १. अंकुश बाबुराव नन्नवरे २. सुलताना जब्बार शहा रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९६६ दि. ०९/१२/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्र ३५४० दिनांक:- २९/१२/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. अंकुश बाबुराव नन्नवरे २. सुलताना जब्बार शहा रा.ता.घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १५५४/२-१ व १५५४/२-२ मधील क्षेत्र १४८.६८ चौ. मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- शमीमबी शेख दाऊद यांची जागा
पश्चिमेस :- सर्जेराव बंडु पवार यांची जागा
दक्षिणेस :- अंबड- पाथरी सरकारी रोड
उत्तरेस :- प्रमोद दत्तोपंत वाडेकर यांची जागा

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र १४८.६८ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही, असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी

# खत अनुदान वितरणासाठी आता ई-बिल प्रणाली

## अनुदानातील गैरव्यवहार टाळता येणार



पुणे : केंद्रीय खत व रसायने मंत्री जे. पी. नड्डा यांनी खत कंपन्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या प्रक्रियेसाठी एकत्रित ई-बिल प्रणालीचे उद्घाटन केले. ही प्रणाली लागू झाल्याने खत अनुदानाशी संबंधित संपूर्ण आर्थिक प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि सुरक्षित होणार असल्याचा केंद्र सरकारचा दावा आहे. या प्रणालीबद्दल बोलताना मंत्री जगत प्रकाश नड्डा म्हणाले की, ''ही ऑनलाइन ई-बिल प्रणाली पारदर्शक, कार्यक्षम आणि तंत्रज्ञानावर आधारित प्रशासन मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. सरकारच्या डिजिटल इंडिया उपक्रमाला ही प्रणाली बळ देणारी ठरेल.'' असेही त्यांनी सांगितले.

सरकार शेतकऱ्यांना खत स्वस्त दरात मिळावे, यासाठी खत कंपन्यांना अनुदान देते. शेतकऱ्यांना खत कमी किमतीत दिल्यानंतर, त्या फरकाची रक्कम सरकारकडून खत कंपन्यांना मिळते. आतापर्यंत खत अनुदानासाठी बिल सादर करणे, तपासणी आणि मंजुरी ही प्रक्रिया मोठ्या प्रमाणात कागदांवर आणि प्रत्यक्ष फाईल्सच्या माध्यमातून केली जात होती. त्यामुळे विलंब, चुका आणि गैरव्यवहाराचा धोका होता. परंतु नव्या ई-बिल प्रणालीमुळे ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन होणार असून, कागदी बिलांची गरज पूर्णपणे संपणार आहे, असा केंद्र सरकारचा दावा आहे. ही ई-बिल प्रणाली खत विभागाच्या इंटिग्रेटेड फायनान्शियल मॅनेजमेंट सिस्टिम (आयएफएमएस) आणि वित्त मंत्रालयाच्या पब्लिक फायनान्शियल मॅनेजमेंट सिस्टिम (पीएफएमएस) यांच्या तांत्रिक सहकार्याने विकसित करण्यात आली आहे. या समन्वयामुळे सर्व आर्थिक व्यवहार एकाच डिजिटल व्यासपीठावर नोंदवले जाणार आहेत. या प्रणालीमुळे सर्व व्यवहारांचा सुरक्षित आणि छेडछाड न करता येणारा डिजिटल रेकॉर्ड उपलब्ध होणार आहे.

त्यामुळे आर्थिक व्यवहारांवर सतत नजर ठेवणे, ऑडिट करणे आणि तपासणी करणे अधिक सोपे होईल. या प्रणालीमुळे दरवर्षी सुमारे २ लाख कोटी रुपयांच्या खत अनुदानाचे वितरण पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार आहे. तसेच या प्रणालीमुळे एंड-टू-एंड डिजिटल बिल प्रक्रिया शक्य होणार असून, अनुदानाचे पेमेंट लवकर होईल. विशेषतः साप्ताहिक खत अनुदान वेळेवर वितरित करणे या प्रणालीमुळे शक्य होणार आहे, असा दावा खत मंत्रालयाचे सहसचिव मनोज सेठी यांनी केला आहे.




### महत्वाच्या घटना

१४९६ : लिओनार्डो डा व्हिन्सीने उडणाऱ्या यंत्राची अयशस्वी चाचणी केली.
१९२५ : बेनिटो मुसोलिनी इटलीचा हुकूमशहा बनला.
१९४३ : पहिल्यांदा टीवी वर हरविलेल्या व्यक्तींविषयी सूचना सुरु करण्यात आली.
१९४७ : अमेरिकन संसदेच्या कामकाजाचे प्रथमच टेलिव्हिजन चित्रीकरण करण्यात आले.
१९५० : पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते पुणे येथे राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन झाले.
१९५२ : स्वतंत्र भारतात पहिल्या राष्ट्रीय निवडणुका झाल्या.
१९५७ : हॅमिल्टन इलेक्ट्रिक या कंपनीने जगातील पहिले बॅटरीवर चालणारे मनगटी घड्याळ विक्रीसाठी आणले.
१९९४ : रवींद्रनाथ टागोरयांनी शांती निकेतन ला पुष्प जत्रेचे उद्घाटन केले.
१९९७ : या दिवशी इटली चे अभिनेते आणि लेखक डारिओ फो यांना नोबेल पारितोषका ने सन्मानित करण्यात आले.
२००४ : नायगाव (ता. खंडाळा, जि. सातारा) येथील सावित्रीबाई फुले यांचे जन्मघर राष्ट्रीय स्मारक घोषित करुन राष्ट्राला अर्पण करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३१ : सावित्रीबाई फुले – समाजसेविका (मृत्यू: १० मार्च १८९७)
१८८२ : प्रसिद्ध कलाकार नंदलाल बोस यांचा जन्म.
१८८३ : क्लेमंट ॲटली  इंग्लंडचे पंतप्रधान (मृत्यू: ८ आक्टोबर १९६७)
१९२१ : चेतन आनंद – हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक (मृत्यू: ६ जुलै १९९७)
१९२२ : सिंधी साहित्यिक किरट बाबाणी यांचा जन्म.
१९२७ : ओडीसा चे माजी मुख्यमंत्री बल्लभ पटनायक यांचा जन्म.
१९३१ : य. दि. फडके – लेखक, विचारवंत व इतिहाससंशोधक (मृत्यू: ११ जानेवारी २००८)
१९४१ : भारतीय अभिनेता संजय खान यांचा जन्म.
१९८१ : भारतीय हॉकी खेळाडू तसेच अर्जुन पुरस्काराने सन्मानित खेळाडू सूरज लता देवी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०३ : ॲलॉइस हिटलर – ॲडॉल्फ हिटलरचे वडील (जन्म: ७ जून १८३७)
१९७२ : ला प्रसिद्ध नाटककार मोहन राकेश यांचे निधन.
१९७५ : बिहारमधील समस्तीपूर रेल्वे स्थानकावरील बॉम्बहल्ल्यात जखमी झालेले रेल्वेमंत्री ललितनारायण मिश्रा यांचे निधन. त्यांच्या हत्येचे गूढ अजुनही उलगडलेले नाही. (जन्म: २ फेब्रुवारी १९२३)
१९७८ : ला विद्वान संशोधक परशुराम चतुर्वेदी यांचे निधन.
१९९४ : अमरेन्द्र गाडगीळ – मराठी बालकुमार साहित्य चळवळीचे प्रवर्तक (जन्म:
१९९८ : प्रा. केशव विष्णू तथा 'बाबा' बेलसरे – तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, श्रीब्रह्मचैतन्य
२००० : डॉ. सुशीला नायर – स्वतंत्र भारताच्या पहिल्या आरोग्यमंत्री, महात्मा गांधींच्या स्वीय सहाय्यिका व डॉक्टर, गांधीवादी कार्यकर्त्या. त्यांनी सेवाग्राम येथे स्थापन केलेल्या एका छोट्या दवाखान्याचे आता 'महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस' या मोठ्या संस्थेत रुपांतर झाले आहे. (जन्म: २६ डिसेंबर १९१४)
२००२ : सतीश धवन – इस्रोचे अध्यक्ष (जन्म: २५ सप्टेंबर १९२०)
२००५ : भारतीय नेते जे. एन. दिक्षित यांचे निधन.

# कांदा साठवणीचे तंत्र, तज्ज्ञांचा सल्ला



कांदा हा वर्षभर लागणारी फळभाजी आहे. महाराष्ट्रात रब्बी हंगामात उत्पादन कांद्याचे ६० टक्के घेतले जाते. त्यामुळे या हंगामातील काढलेला कांदा एप्रिलपासून साठवलेला असतो. कांद्याची चांगली टिकवणक्षमता मिळण्यासाठी उच्च गुणवत्तेच्या बिया म्हणजेच योग्य वाण वापरण्याची आवश्यकता असते. संतुलित प्रमाणात खते द्यावीत आणि विशेषतः पोटॅशचे प्रमाण जास्त ठेवावे, कारण यामुळे कांद्याची साठवणक्षमता वाढते. पाण्याचा वापर करताना अतिक्षारयुक्त पाणी देणे टाळावे, कारण त्याने कांदा लवकर खराब होतो. तसेच रासायनिक औषधांचा अतिरेक टाळून जैविक औषधांवर भर द्यावा. काढणी योग्य वेळी करावी, जेव्हा अर्ध्यापेक्षा जास्त पात वाळतात आणि पात्याची मान खाली झुकते तेव्हा काढणी उत्तम मानली जाते.

काढणीनंतरचे उपाय : काढणीनंतर कांद्याला ४-५ दिवस शेतातच सुकवावे आणि नंतर सावलीत १५ दिवस व्यवस्थित सुकवून साठवणुकीसाठी तयार करावे. मान कापताना ती २ सें.मी. वरून बारीक कापावी. साठवणीसाठी मोकळी, वाहती हवा असलेली जागा निवडावी आणि कांदा चाळ निर्जंतुक करून घ्यावी. खराब कांदे वेळीच वेगळे काढावेत कारण ते चांगल्या कांद्यांवर परिणाम करतात. कांदे चाळीत रचताना खालचे कांदे वर आणि वरचे कांदे खाली करुन भरावेत. या कांदा चाळीची उंची ४ फुटापेक्षा जास्त नसावी. प्रामुख्याने या चाळीमध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. कांदा चाळींसाठी अनुदान : कांदा साठवण्यासाठीच्या पारंपरिक कांदा चाळींसाठी राज्यशासन अनुदान देते. चार हजार रुपये प्रती मेट्रीक टन या प्रमाणाने राज्य सरकार कांदा चाळींसाठी शेतकऱ्यांना अनुदान देते. ह्या चाळीची रचना कांदा व लसूण संशोधन संस्थान आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दिलेल्या रचनेप्रमाणे करावी. केवळ याच रचनेसाठी राज्यसरकार अनुदान देते. त्यामुळे शेतकऱ्यांनी चाळीची बांधणी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनीच करावी. आधुनिक पद्धती : कांदा साठवण्यासाठी पारंपरिक चाळींसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही फायदेशीर आहे. कंट्रोल्ड ॲट्मॉस्फेरिक ओनियन स्टोरेज म्हणजेच नियंत्रित तापमान कांदा साठवण पद्धतीत २७ तापमान आणि ६०-६५% आद्रता कायम ठेवली जाते, तसेच एअर सर्क्युलेशन सिस्टमद्वारे हवा खेळती ठेवली जाते. या तंत्रज्ञानामुळे कांद्याचे नुकसान अत्यल्प होते. त्याशिवाय शीतगृह सुद्धा एक चांगला पर्याय आहे. येथे ० तापमान आणि ६५-७०% आद्रता ठेवल्यास सहा महिन्यांनंतर फक्त ५% पर्यंतच नुकसान होते. नुकसान टाळण्यासाठी महत्त्वाचे सल्ले : योग्य वाण निवडणे (उदा. एन-२-४-१, भीमा किरण, भीमा शक्ती). संतुलित खत व्यवस्थापन, विशेषतः नत्राचे प्रमाण नियंत्रित ठेवणे. योग्य वेळी काढणी आणि योग्य प्रकारे सुकवणे. खेळती हवा, नियंत्रित आर्द्रता आणि योग्य पॅकिंग (ज्यूट, जाळीदार पिशव्या) वापरणे. खराब कांदे वेळोवेळी वेगळे काढून चाळ स्वच्छ ठेवणे.

# मराठवाडा कृषी विद्यापीठाचे बाजरी पिकात मोठे यश; दोन वाणांना मान्यता

संभाजीनगर : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्पाद्वारे विकसित केलेल्या बाजरीच्या (जैवसंपृक्त) दोन संकरीत वाणांना मान्यता मिळाली आहे. या वाणांची भारत सरकारच्या वनस्पती वाण संरक्षण आणि शेतकरी हक्क नोंदणी प्राधिकरणाकडून अधिकृत नोंदणी मिळाली आहे.

ही नोंदणी विद्यापीठासाठी अत्यंत गौरवास्पद असून संशोधन क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण यश मानले जात आहे. हे यश माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, सततच्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळे शक्य झाले. तसेच संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांचे मोलाचे सहकार्य व शास्त्रीय मार्गदर्शन लाभले. याशिवाय या प्रक्रियेत नोडल अधिकारी डॉ. व्ही.एन. चिंचणे यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

ही नोंदणी विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या सातत्यपूर्ण संशोधन कार्याची पावती असून विकसित झालेल्या या संकरित जाती शाश्वत शेतीस चालना देणाऱ्या ठरणार आहेत. त्यामुळे मराठवाडा विभागातील कोरडवाहू शेतीसाठी उपयुक्त व अधिक उत्पादनक्षम बाजरीच्या जाती शेतकऱ्यांना उपलब्ध होणार असून त्यातून उत्पादन व उत्पन्न वाढीस मोठा लाभ होणार आहे. या वाणांमुळे उत्पादनक्षमता वाढून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास मदत होईल. त्यामुळे ही नोंदणी शेतकरी, संशोधक व विद्यापीठ यांच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठातील सर्व संबंधित शास्त्रज्ञ, संशोधक व कर्मचारीवर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

बाजरीचा संकरीत वाण एएचबी-१२०० : हा वाण २०१७ साली प्रसारित करण्यात आला असून खरीप हंगामासाठी विशेष शिफारस करण्यात आली आहे. या वाणाचा पिकाचा कालावधी केवळ ८० ते ८५ दिवस इतका असून अल्प कालावधीत भरघोस उत्पादन देण्याची क्षमता या वाणामध्ये आहे. हेक्टरी धान्य उत्पादन २५ ते ३० क्विंटल तर कडबा उत्पादन ५५ ते ६० क्विंटल इतके मिळते. या वाणाची कणसे घट, दाणे टपोरे असून त्यांचा रंग हिरवट आहे. तसेच फुटव्याचे प्रमाण जास्त असल्याने उत्पादनात लक्षणीय वाढ होते. १००० दाण्यांचे वजन १५ ते १८ ग्रॅम इतके असून धान्य दर्जेदार मिळते. या वाणामध्ये लोहाचे सरासरी प्रमाण ८८ मि.ग्रॅ./कि.ग्रॅ. तर जस्ताचे प्रमाण ४३ मि.ग्रॅ./कि.ग्रॅ. इतके असून पोषणमूल्याच्या दृष्टीने हा वाण अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे या वाणाची संपूर्ण देशात प्रसारासाठी शिफारस करण्यात आली आहे. विशेष म्हणजे हा वाण गोसावी व करपा रोगास प्रतिकारक असल्यामुळे रोगांपासून होणारे नुकसान कमी होते. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळण्याची संधी उपलब्ध होत आहे.

बाजरीचा संकरीत वाण एचबीबी-१२६९ : हा वाण सन २०१८ मध्ये प्रसारित करण्यात आला असून खरीप हंगामासाठी विशेषतः शिफारस करण्यात आली आहे. हा वाण ८० ते ८२ दिवसांत तयार होतो. याची धान्य उत्पादकता प्रतिहेक्टरी ३० ते ३२ क्विंटल तर कडबा उत्पादन ७२ ते ७५ क्विंटल इतके मिळते. या वाणाचे कणीस घट्ट व टपोरे असून दाण्यांचा रंग हिरवट आहे. फुटव्याचे प्रमाण अधिक असल्याने उत्पादनात वाढ होते. १००० दाण्यांचे वजन १५ ते १८ ग्रॅम इतके आहे. या वाणामध्ये पोषणमूल्येही अधिक असून लोहाचे प्रमाण सरासरी ९१ मि.ग्रॅ./कि.ग्रॅ. व जस्ताचे प्रमाण ४५ मि.ग्रॅ./कि.ग्रॅ. इतके आहे. त्यामुळे हा वाण पोषणदृष्ट्या समृद्ध मानला जात आहे. या गुणवत्तेमुळे संपूर्ण देशात प्रसार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच हा वाण गोसावी व करपा रोगास प्रतिकारक असल्यामुळे उत्पादनात स्थिरता मिळते व शेतकऱ्यांचा खर्च कमी होतो. त्यामुळे मराठवाड्यासह इतर कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांसाठी हा बाजरी वाण फायदेशीर ठरणार आहे.

# उसाला तुरा येण्याची कारणे आणि उपाय



राज्यात सध्या ऊस तोडणी हंगाम जोमात सुरू आहे. हंगामानुसार उसाच्या जाती तसेच साखरेचे प्रमाण (पक्वता) तपासून उसाची तोडणी करण्यात येत असल्याने अपेक्षित ऊस व साखर उत्पादन मिळण्यास मदत होते. तथापि, राज्यातील काही भागांमध्ये ऊस पिकाला तुरा दिसून येत आहे. तुरा आल्यानंतर उसाची वाढ थांबते, कांडीमध्ये साठवलेली साखर तुरा निर्मितीसाठी वापरली जाते. त्यामुळे उत्पादन व गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. सामान्यतः उसाची शाकीय वाढ दीर्घकाळ चालत राहून कांडीमध्ये साखरेचा साठा वाढणे अपेक्षित असते.

परंतु प्रतिकूल हवामान, दिवस-रात्रीच्या कालावधीत होणारे बदल, पाणी व अन्नद्रव्यांचा ताण तसेच काही जातींची आनुवंशिक प्रवृत्ती यामुळे ऊस वेळेपूर्वी प्रजनन अवस्थेत प्रवेश करतो व तुरा येतो. परिणामी, रसाचे प्रमाण कमी होऊन ऊस पोकळ व हलका बनतो. याचा शेतकरी आणि साखर कारखाने दोघांनाही फटका बसतो. त्यासाठी ऊस पिकात तुरा येण्याची कारणे, त्यातून होणारे नुकसान आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय आदी बाबींबाबत शास्त्रीय माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे.

उसाला तुरा येण्याची कारणे : दिवस छोटा आणि रात्र मोठी होते, तेव्हा उसाच्या पानांमध्ये फ्लोरिजेन हार्मोन तयार होऊ लागते. हे फ्लोरिजेन पानांमधून शेंडा कळी कडे जाते व तुरा निर्मितीची सुरुवात करते. भारतात प्रामुख्याने सप्टेंबर- ऑक्टोबर या महिन्यांमध्ये अशा प्रकारचे हवामान असल्यामुळे उसाला मोठ्या प्रमाणात तुरा येतो.

तापमान : उसाला तुरा येण्यासाठी २० ते ३० अंश सेल्सिअस तापमान पोषक ठरते. जास्त उष्णता किंवा खूप थंडी असल्यास तुरा येण्यावर परिणाम होतो.

जातीचा प्रभाव : काही ऊस जातींमध्ये तुरा येण्याची प्रवृत्ती असते, तर काही जाती तुरा न येणाऱ्या किंवा कमी येणाऱ्या असतात. उदा. को. सी. ६७१ मध्ये तुरा लवकर येतो, तर को. ८६०३२ मध्ये उशिरा तुरा येतो.

पाणी व आर्द्रता : ऊस पिकास सतत पाणी दिल्यास किंवा जमिनीतून पाण्याचा योग्य निचरा होत नसल्यामुळे जमिनीत जास्त आर्द्रता व दीर्घकाळ संतुलित ओलावा राहतो. अशा परिस्थितीत उसाला ताण न येता पिकाची जैविक प्रक्रिया सक्रिय राहते. या दरम्यान दिवस- रात्र कालावधी व तापमान अनुकूल असल्यास तुरा येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे सर्वसाधारणपणे सतत पाणी दिलेल्या उसात किंवा पावसाळ्यानंतर तुरा येण्याचे प्रमाण जास्त दिसून येते. त्यासाठी योग्य सिंचन नियोजन करणे तसेच जमिनीचा निचरा व्यवस्थित ठेवणे हे तुरा नियंत्रणासाठी महत्त्वाचे ठरते.

खत व्यवस्थापन : ऊस पिकात खतांचे व्यवस्थापन हे तुरा येण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. नत्राचे जास्त प्रमाण दिल्यास उसाची शाकीय वाढ होते, मात्र काही संवेदनशील जातींमध्ये यामुळे जैविक असंतुलन निर्माण होऊन तुरा येण्यास चालना मिळते. तसेच नत्र, स्फुरद, पालाश यांचे असंतुलित प्रमाण दिल्यास पिकाची वाढ समतोल राहत नाही, अन्नद्रव्यांचे योग्य वहन होत नाही. त्यामुळे ऊस लवकर प्रजनन

अवस्थेकडे वळतो. म्हणून तुरा येण्याचे प्रमाण कमी ठेवण्यासाठी उसाला शिफारशीनुसार एकात्मिक अन्नद्रव्ये खत व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे

लागवडीचा कालावधी व पिकाचे वय : उशिरा लागवड करणे किंवा बेणे बदल न केल्यास तसेच जास्त वयाचे बेणे वापरल्यास लवकर तुरा येतो.

ताण : उसाला पाण्याचा ताण, तापमानातील अचानक बदल किंवा अन्नद्रव्यांचा ताण यामुळेही काही वेळा तुरा येऊ शकतो. ऊस पिकाला पाण्याचा ताण बसल्यास उसाची शाकीय वाढ मंदावते, त्यामुळे उसामध्ये कार्बोहायड्रेट्स (शर्करा, स्टार्च) साठा वाढतो. त्यामुळे उसामध्ये तुरा येण्याची प्रक्रिया सुरू होते. विशेषतः जुलै- ऑगस्टमध्ये पाण्याचा ताण आणि त्यानंतर अचानक पाणी दिल्यास तुरा येण्याची शक्यता वाढते.

तुरा रोखण्यासाठी उपाय : सुरु हंगाम लागवड : १५ डिसेंबर ते १५ फेब्रुवारी या कालावधीत केल्यास उसाची वाढ योग्य प्रकारे होते व तुरा येण्याची शक्यता कमी राहते. शिफारस केलेल्या कालावधीपेक्षा खूप उशिरा किंवा खूप अगोदर ऊस लागवड केल्यास पीक वाढीच्या टप्प्यावर प्रतिकूल परिणाम होऊन तुरा येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे तुरा नियंत्रणासाठी हंगामानुसार योग्य वेळेत ऊस लागवड करणे हे महत्त्वाचे व्यवस्थापन तंत्र आहे. सिंचन व्यवस्थापन : ऊस पिकामध्ये योग्य सिंचन व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. कारण पाण्याचा ताण तुरा येण्यास कारणीभूत ठरतो. ऊस पिकास हलके पण नियमित सिंचन देणे आवश्यक आहे. पीक वाढीच्या कोणत्याही टप्प्यावर पाणी ताण येऊ देऊ नये. कारण पाण्याच्या ताणामुळे उसाची शाकीय वाढ मंदावते व तुरा येण्याची प्रक्रिया सुरु होते. विशेषतः ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीत पाण्याचा ताण पडल्यास तुरा येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे योग्य वेळेस व आवश्यकतेनुसार सिंचन करून जमीन वाफसा स्थितीमध्ये ठेवणे हे तुरा नियंत्रणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

संतुलित खत व्यवस्थापन : माती परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्यानुसार नत्र, स्फुरद आणि पालाश तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या मात्रा ठरवून द्याव्यात. रासायनिक खतांचा वापर शिफारशीत मात्रेपेक्षा जास्त प्रमाणात केल्यास तुरा लवकर येतो. सेंद्रिय खते शेणखत, कंपोस्ट, कारखान्यातील कुजलेली मळी, कोंबडी खत, विविध प्रकारच्या पेंडी, गांडूळ खत इ. वापरल्यास पिकाची शाकीय वाढ व प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. योग्य वाणांची निवड : तुरा येण्याची प्रवृत्ती कमी असलेले ऊस वाण लागवडीसाठी निवडावेत.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.३ जानेवारी २०२६ ५

# रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीस झेंडी दाखवून जिल्हाधिकारी मित्तल यांच्या हस्ते मार्गस्थ

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात राज्य रस्ता सुरक्षा अभियान १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरुकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. राज्य रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ च्या शुभारंभानिमित्त रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीचे १ जानेवारी २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ च्या शुभारंभाचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, मोटार वाहन निरीक्षक भिमराज नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जानजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिक, वाहनचालक, शालेय विद्यार्थ्यांमध्ये मुख्यत: जनजागृती करण्यात येणार आहे. यावर्षीच्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याची संकल्पना ''सडक सुरक्षा जीवन रक्षा'' अशी असून रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाच्या जीवनरक्षणाशी निगडीत आहे, हा संदेश सर्वसामान्यांपर्यत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. सडक सुरक्षा जीवन रक्षा ही संकल्पना ठेवण्यात आली आहे. अतिवेगाने तसेच मद्यपान करुन वाहन चालवू नका, वाहने काळजीपूर्वक चालवा, स्वत:ची आणि इतरांची काळजी घ्यावी तसेच वाहने चालवताना मोबाईलचा वापर करु नका, समोरील वाहनापासून सुरक्षित अंतर ठेवा, वाहतुकीचे नियम पाळा अशा प्रकारचा संदेश देण्यात येत आहे. तसेच या रॅलीस मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून मार्गस्थ करण्यात आले. रस्ता सुरक्षा जनजागृती ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालयातून सुरुवात होवून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जालना येथे समारोप करण्यात आला. रॅलीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी होते.

# संत भगवानबाबांच्या पुण्यतिथीची तयारी

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी सोहळयाची भव्य तयारी श्री क्षेत्र भगवानगडावर सुरू झाली आहे. रविवार, दि. ४ जानेवारी रोजी पुण्यतिथी साजरी होत असून, यानिमित्ताने गडावर भव्य मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. भाविकांसाठी सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसाद तयार केला जाणार आहे. लाखो भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र व सुयोग्य पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, या व्यवस्थेसाठी पोलीस प्रशासनासह घोगस पारगांव व भारजवाडी येथील तरुणांवर विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध संस्थानांहून तसेच गावोगावाहून लहान-मोठ्या अनेक दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर दाखल होत आहेत. सर्व कार्यक्रमांचे नियोजन व देखरेख मठाधिपती ह.भ.प. न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत काटेकोरपणे करण्यात येत आहे. रविवारी सकाळी ९ वाजता श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा होणार आहे. दुपारी १२ वाजता काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसाद वाटप करून पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होईल. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती तथा वारकरी संप्रदायाचे भूषण ह.भ.प. न्यायाचार्य श्री. नामदेव महाराज शास्त्रीजी यांचे कीर्तन म्हणजे वारकरी व रसिकांसाठी पर्वणीच असते. श्री संत भगवानबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्ताने रविवारी त्यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, सर्व भाविक-भक्तांनी वेळेवर श्री क्षेत्र भगवानगडावर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पुण्यतिथी सोहळयासाठी जमणाऱ्या लाखो भाविकांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था, महिलांची सुरक्षितता, संभाव्य चोऱ्या रोखणे व इतर नियोजनबद्ध व्यवस्थापनासाठी घोगस पारगांव व भारजवाडी येथील तरुण पोलीस प्रशासनाला सक्रिय सहकार्य करणार आहेत.

# महापालिकेत विखे,जगताप एक्स्प्रेस सुसाट; पाच नगरसेवक बिनविरोध

## अहिल्यानगरमध्ये महायुतीचा निवडणूकीआधीच गुलाल, सत्ता एकहाती येण्याचे संकेत

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर महापालिका निवडणुकीआधीच राजकीय वातावरण तापले असून भारतीय जनता पक्षाने आघाडी घेतल्याचे चित्र आहे. नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांची परंपरा कायम ठेवत भाजपने महापालिकेतही विजयाचा गुलाल उधळण्यास सुरुवात केली आहे. निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीलाच महायुतीचे पाच उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने शहराच्या राजकारणात मोठी चर्चा रंगली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री विखे पाटील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप राष्ट्रवादी महायुतीने शहराच्या राजकारणात ठोस पकड निर्माण केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. प्रभाग क्रमांक सातमधून पुष्पां अनिल बोरुडे, तर प्रभाग क्रमांक सहामधून करण कराळे आणि सोनाबाई शिंदे हे भाजपचे तीन उमेदवार कोणताही सामना न होता विजयी ठरले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)नेही निवडणुकीत खाते उघडले आहे. प्रभाग क्रमांक ८ मधून कुमार वाकळे आणि प्रभाग क्रमांक १४ मधून प्रकाश भागानगरे हे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.

एकूणच, निवडणूकपूर्व टप्प्यातच बिनविरोध विजयानं अहिल्यानगरच्या राजकारणात सत्ता एकहाती जाण्याचे संकेत मिळत आहेत. पालकमंत्री तसेच मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या रणनितीमुळे भाजपचा आत्मविश्वास अधिक बळावला आहे. या निवडणुकीत तब्बल पाच नगरसेवक बिनविरोध निवडून येणे ही घटना राजकीय वर्तुळात 'भूतो न भविषयती' अशी मानली जात आहे. निवडणूकपूर्व टप्प्यातच एवढ्या मोठ्या प्रमाणावर बिनविरोध यश मिळाल्याने महायुतीच्या संघटनात्मक ताकदीचा अंदाज आला आहे. येत्या पंधरा तारखेला जाहीर होणारा निकाल भाजप राष्ट्रवादी महायुतीचाच असेल, असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांपासून नेत्यांपर्यंत व्यक्त केला जात आहे. बिनविरोध विजयामुळे महायुतीचे पारडे आधीच जड झाल्याचे चित्र आहे. खासदारकीच्या निवडणुकीत पराभव झाला असला, तरी डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यानंतरही शहरासाठी सातत्याने काम सुरू ठेवले. विकासकामांकडे लक्ष देणे, विविध योजनांसाठी निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणे आणि नागरिकांशी थेट संपर्क ठेवणे या भूमिकेमुळे त्यांच्याविषयी शहरात सहानुभूती निर्माण झाली आहे. खासदार असताना राबवलेल्या विकासकामांचा ठसा आणि त्यानंतरही कायम राहिलेली सक्रियता याच जोरावर पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याचे बोलले जात आहे. यामुळे नेतृत्वावरचा जनतेचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे दिसते.

अहिल्यानगर शहराचा विकास सुजय विखे पाटील आणि संग्राम जगताप हेच प्रभावीपणे करू शकतात, हे या निवडणूक प्रक्रियेतून पुन्हा एकदा सिद्ध झाल्याची भावना राजकीय व सामाजिक स्तरावर व्यक्त होत आहे. एकूणच, बिनविरोध निवडी आणि निर्माण झालेली सहानुभूती यामुळे महायुतीचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. महापालिका निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या काही तास अगोदर केडगावमध्ये कोतकर समर्थकांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे एबी फॉर्म नाकारले. परंतु, केडगामध्ये अनेकांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले होते. केडगामध्ये अपक्षांनी एकत्र येत आघाडी करत निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकला आहे. त्यामुळे केडगावमध्ये युती विरुद्ध अपक्षांची आघाडी असा सामना रंगणार आहे.

# अवयवदानातून ६ जणांना जीवनदान; धनंजय काळे यांचे प्रेरणादायी योगदान

जालना। प्रतिनिधी

धनंजय अनंत काळे या परभणी वय २५ वर्ष वैद्यकीय शिक्षण सुरू असताना यांचा काकडे पेट्रोल पंप, समृद्धी टी-पॉईंट परिसरात भीषण अपघात झाला.या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. त्यानंतर त्यांना तात्काळ संजिवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, जालना येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता तातडीने क्रॅनिओटोमी शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र दुर्दैवाने शस्त्रक्रियेनंतरही रुग्णाच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. १ जानेवारी २०२६ रोजी पहाटे वैद्यकीय चाचणीनंतर धनंजय यांना ब्रेन स्टेम डेड घोषित करण्यात आले. यानंतर डॉ. बळीराम बागल यांनी ही बाब रुग्णाच्या नातेवाईकांना समजावून सांगितली. रुग्णाचे नातेवाईक असलेले डॉक्टर डॉ. प्रताप वझरकर तसेच धनंजय यांच्या आई-वडिलांशी अवयवदानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

अपार दुःखात असूनही, धनंजय यांच्या आई-वडिलांनी आणि कुटुंबीयांनी अत्यंत धैर्यशील व समाजहिताचा निर्णय घेत अवयवदानासाठी संमती दिली. या उदात्त निर्णयामुळे एकूण ६ रुग्णांना नवजीवन मिळाले. ग्रुप मार्फत अवयवांचे वाटप करण्यात आले फुफ्फुस डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, पुणे यकृत (लिव्हर) रुबी हॉल क्लिनिक, पुणे एक मूत्रपिंड डॉ. हेडगेवार हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर दुसरे मूत्रपिंड सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर दोन्ही डोळे श्री गणपती नेत्रालय, जालना रुग्णाचे पार्थिव हॉस्पिटलमधून बाहेर नेत असताना राष्ट्रगीताने सन्मान देऊन त्यांना अश्रुपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक आरती जाधव यांच्यासह पोलीस प्रशासन उपस्थित होते. सर्व अवयवांचे ग्रीन कॉरिडोरद्वारे सुरक्षित स्थलांतर करण्यात आले. तसेच सर्व तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत शासनमान्य प्रक्रियेनुसार अवयव काढण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत संजिवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल, डॉ. शिवदास मिरकर, डॉ. कैलास राजगुरू, डॉ. निशांत गोयल, डॉ. शालिक जाधव, डॉ. अविनाश पोळ, हर्षदा बागल, अमोल कदम तसेच हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.मृत्यूनंतरही जीवन देणारा धनंजय काळे यांचा निर्णय समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# ग्रामीण भागातील ९वी व १० वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केल्या स्वत:च्या वेबसाईट्स



लातूर। प्रतिनिधी

जिल्ह्यातील औसा तालुक्यातील श्री गणेश विद्यालय, उजनी (ता. औसा, जि. लातूर) येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत स्वतःच्या वेबसाईट्स तयार केल्या आहेत. १.५ (..) या - कंपनी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेब डेव्हलपमेंट व आधुनिक - आधारित कोडिंगचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सार्थक वाघमारे, अमृता वाघमारे आणि इराम रुईकर या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण करून स्वतःचे प्रोजेक्ट यशस्वीरीत्या सादर केले.अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेतच प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक कोपरकर सर, पर्यवेक्षक ठाकूर सर तसेच विज्ञान शिक्षक टापरे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा आधुनिक शिक्षण उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली. या प्रसंगी १.५ चे संस्थापक मोहम्मद पांजेशा व आरेफ मन्यारी यांनी सांगितले की, ''आज जगातील अनेक प्रगत देशांमध्ये पहिलीपासूनच कोडिंग आणि शिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. आमचे उद्दिष्ट लातूर जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच दर्जाचे आधुनिक, -आधारित आणि कौशल्याधिष्ठित शिक्षण उपलब्ध करून देणे आहे. यासाठी शासनाची साथ आणि मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे.''

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र ; अहिल्यानगर जिल्ह्यात दोन शिक्षकांसह चौघे अटकेत

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्हा रूग्णालयातून बनावट दिव्यांग प्रमाणपत्र काढून त्याच्या आधारे शासकीय नोकरी मिळवलेल्या तिघांसह चौघांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गुरूवारी (१ जानेवारी) सायंकाळी अटक केली. यामध्ये दोघांनी शिक्षक म्हणून, तर एकाने तहसील कार्यालयात क्लार्क पदावर नोकरी मिळवली आहे. चौथ्या संशयिताने शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचा संशय असून त्याच्याकडे चौकशी सुरू आहे.

गदेवाडी (ता. शेवगाव) येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असलेला भारत भागीनाथ फुंदे (वय ३४, रा. भुते टाकळी, ता. पाथर्डी), मंगळूरपीर (जि. वाशिम) येथील तहसील कार्यालयात क्लार्क पदावर कार्यरत असलेला नागनाथ जगन्नाथ गर्जे (वय ३४, रा. भगवाननगर, पाथर्डी), पुणे महापालिकेच्या मुंढवा शाळेत शिक्षक असलेला देवीदास प्रकाश बोरूडे (वय ३५, रा. तनपुरवाडी, ता. पाथर्डी) तसेच खंडेराव ज्ञानोबा फुंदे (वय ३२, रा. भुते टाकळी, ता. पाथर्डी) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. जिल्हा रूग्णालयातील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता तसेच रूग्णालयात नोंद न करता थेट ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरून बनावट दिव्यांग प्रमाणपत्र काढण्यात आल्याचा प्रकार जिल्हा रूग्णालय प्रशासनाच्या चौकशीतून उघडकीस आला होता. याप्रकरणी जिल्हा रूग्णालय प्रशासनातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पुढे आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक गणेश उगले या गुन्ह्याचा तपास करीत आहेत. दरम्यान, या गुन्ह्यातील जिल्हा रूग्णालयातील एका संशयित आरोपी कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. तसेच या प्रकरणातील तिघांनी अटकपूर्व जामीन घेतला आहे. यापूर्वी तिघांना अटक करण्यात आली आहे. गुरूवारी सायंकाळी चौघांना अटक करण्यात आली असून त्यांना आज (शुक्रवार) न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी मिळवलेल्या तिघांना अटक झाल्याने नोकरदार वर्गात खळबळ उडाली आहे. तसेच अशाच पध्दतीने आणखी काही जणांनी शासकीय नोकऱ्या मिळवल्याचे पोलिसांच्या तपासातून समोर येत आहे.

# मंदिरात लग्न करुन,१० लाखाची शाळेला दिली देणगी

## गावच्या जि.प. शाळेला अद्यावत संगणक कक्ष बांधुन देण्याचा वधु वरांचा संकल्प

परभणी। प्रतिनिधी

परभणी येथील रहिवाशी असणारे शेखर उतरा माधव शेजुळ या इंजि. तरुणाने आपल्या लग्नात कुठलाही बडेजाव पणा न दाखवता अगदी साध्या पद्धतीने दत्त मंदिरात खरोळा ता.रेणापुर जि.लातुर लग्न सोहळा आनंदोत्सवात पार पाडला! आबेगाव ता.माजलगाव जि.बीड येथील मुळ रहिवाशी असलेले व महाराष्ट्र शासनाचा क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च समजला जाणारा शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. माधव देसाई शेजुळ हे परभणी येथील ज्ञानोपासक वरिष्ठ महाविद्यालयातुन शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख या पदावरून नुकतेच ( ३१/५/२०२५ रोजी ) सेवानिवृत्त झाले आहेत . इंजि . शेखर शेजुळ हा त्यांचा एकुलता एक मुलगा आहे. तीन वर्षापासुन नौकरीस आहे. यापुर्वी सुध्दा नौकरीचा पहिला पगार शेखर ने आपल्या गावातील जि.प.शाळेच्या विकास कामाला दिला होता. शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय संजय राठोड गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली. समस्त गावकरी लोकसहभागातून जि प. शाळेचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करित आहेत....! गावकर्यांनी निर्धारित/ निश्चित केलेला ध्येयवादी महत्वकांक्षी प्रकल्प पुर्णत्वाकडे नेण्यासाठी या लोक चळवळीत आपला ही खारीचा वाटा/सहभाग असला पाहिजे. या हेतुने प्रा. डॉ. माधव देसाई शेजुळ यांनी ( २०१९ ते २०२५ पर्यंत) आपल्या स्वत:च्या उत्पन्नातून गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विकास कामाला जमीन खरेदीसाठी व कंपाउंड वॉल बांधण्यासाठी ) आतापर्यंत अंदाजे १५ लाख रुपये देणगी दिलेली आहे .

चि. शेखर शेजुळ चा शुभ विवाह बावी ता.वाशी जि.धाराशिव येथील माजी मुख्याध्यापक अक्रुरराव कृष्णाजी शिंदे यांची नात व सौ .रेखा व संतोष अक्रुरराव शिंदे यांची सुकन्या चि. सौ.का ऋतुजा हिच्यासोबत खरोळा येथील दत्त मंदिरात फक्त २५ नातेवाईकांच्या उपस्थितीत हिंदु धर्मातील रुढी परंपरेनुसार अगदी साध्या पद्धतीने हर्षोल्लासात संपन्न झाला. लग्न सोहळ्याचे वैशिष्ट्ये म्हणजे कोणत्याही स्वरुपात वधु पक्षाकडुन हुंडा / सोने/चांदी घेतले नाही, कोणतेही संसार उपयोगी साहित्य नाही,आहेर भेटी नाही, आतिषबाजी,वाजंत्री/, निमत्रंण पत्रिका , घोडा, फोटोग्राफी, मंडप , डेकोरेशन, बॅनरबाजी यासारख्या खर्चीकबाबी वर होणारा खर्च जाणीवपुर्वक टाळला.

यातुन बचत होणारी रक्कम गावातील जिल्हा परिषद शाळेला अर्पण/दान करण्याची ईच्छा शेजुळ कुटुंबातील विलास देसाई शेजुळ ,प्रा. डॉ. माधव देसाई शेजुळ , सौ. उतरा माधव शेजुळ व चि.शेखर माधव शेजुळ यांनी शिंदे कुंटुबातील सदस्यासमोर व्यक्त केली होती. या विवाह सोहळयात सक्रिय सहभाग घेणारे मुलीचे मामा प्रा. प्रभाकर रामराव माने कारेपुर ता. रेणापूर जि. लातुर ) व लहाने चुलते इंजि. अतुल अक्रूरराव शिंदे यांची सकारात्मक भुमिका या आगळया-वेगळया विवाह सोहळ्यासाठी निर्णायक व महत्वपूर्ण ठरली....! त्यांच्या सहकार्यामुळेच शेजुळ परिवाराने चार वर्षापुर्वीच निश्चित केलेला व अपेक्षीत असणारा नाविन्यपूर्ण असा विवाह सोहळा उत्साहात व आंनदीमय वातावरणात पार पडण्यास मदत झाली. या सहकार्याबदल वधु मंडळीचे शेजुळ परिवारातर्फे मनपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत. दोन्ही परिवाराने प्रत्येकी ५ - ५ लाख रुपये एकत्र जमा करायचे व एकुण १० लाख रुपये इंजि.शेखर माधव शेजुळ यांचे मुळगाव आबेगाव ता.माजलगाव जि.बीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक सरकारी शाळेला अर्पण/दान करायचे ,असा निर्णय दोन्ही कुटुंबातील सदस्यांनी एकमताने घेतला आहे . या १०,००००० /- रु . देणगीमधुन शाळेतील विद्यार्थ्यासाठी अद्यावत असे संगणक कक्ष बांधुन देण्याचा निर्धार नवदांपत्यांनी केला आहे.याकामी समस्त ग्रामस्थांच्या सहकार्याने दोन्ही कुंटुब आपली महत्वकांक्षा पुर्णत्वास नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहेत.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू- हदगल

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात हजरत अली जन्मदिवस, संत भगवानबाबा पुण्यतिथी, अंगारक चतुर्थी, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती, मकर संक्राती आणि मराठवाडा विद्यापीठ नामांतर वर्धापनदिन सोहळा या सण, उत्सव आणि महानगरपालिका मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया, तसेच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१६ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १६ जानेवारी २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही.

व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# क्षीरसागर मुक्तीचा नारा देणाऱ्यांचे घोडे क्षीरसागरांपाशीच अडले

## उपमुख्यमंत्री अजित दादा व आ.संदीप क्षीरसागर यांच्या भेटीने अनेकांच्या भुवया उंचावल्या

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगरपालिका निवडणुकीमध्ये अनेकांनी दंड थोपटून बीड नगरपालिका क्षीरसागर मुक्त करण्याची घोषणा केली, अनेकांनी दंड थोपटले. मात्र नियतीने आज क्षीरसागरांनाच शरण जाण्याची वेळ दंड थोपटणाऱ्यांवर आणली आहे. आगामी राजकारण हे क्षीरसागरां भोवतीच फिरत असून क्षीरसागरां मुळेच नगरपालिकेचं घोडं अडणार आहे.**

बीड नगरपालिकेमध्ये नगराध्यक्ष अजित दादा पवार यांच्या गटाचा झाला असला तरी उपाध्यक्ष आणि इतर समित्यांसाठी इतर सर्व एकत्र केले तरी क्षीरसागर यांची मदत घेतल्याशिवाय या कमिट्या आणि उपाध्यक्ष होत नाही हे स्पष्ट झाले आहे. बीड शहरांमध्ये झालेल्या कार्यक्रमानंतर दुसऱ्याच दिवशी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि बीडचे शरदचंद्र पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांची भेट झाली. यात काय चर्चा झाली हे जरी स्पष्ट झाले नसले तरी या भेटीने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. बीड शहरामध्ये नगरपालिका निवडणुकीत डॉ. योगेश क्षीरसागर यांनी अजित दादा पवार गटाला सोडून भाजपात प्रवेश केला. आणि भाजपाला चांगले यश मिळून दिले भाजपाच्या एक किंवा दोन जागा असायच्या मात्र आता त्या १५ जागा झाल्या आहेत. आ. संदीप क्षीरसागर यांना मात्र मुस्लिम मतदारांनी नाकारल्याने त्यांना १२ जागांवर समाधान मानावे लागले. त्यांच्यासोबत निवडणूक लढवलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना गटाला एक जागा मिळाली. तर मुस्लिम मतदारांच्या पाठिंबावर अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला चांगले यश मिळाले. त्यांना या निवडणुकीमध्ये १९ जागा मिळाल्या. त्याचे सर्व श्रेय शेख मुजीब यांना आहे मुस्लिम मतदारांना आपल्याकडे खेचण्यात यशस्वी





झाले .त्यांच्यासोबत असलेल्या शिवसेना शिंदे गटाला तीन, कॉंग्रेसला एक तर एआयएमआयएमला एक जागा मिळाली .क्षीरसागर वगळता सर्व जागा मिळूनही एकूण २५ होतात. बीड नगरपालिकेमध्ये ५२ नगरसेवक आहेत. त्यापैकी २७ नगरसेवक डॉ. योगेश क्षीरसागर व आ. संदीप क्षीरसागर यांच्याकडे आहेत. शेवटी नियतीने बीड नगरपालिका क्षीरसागर मुक्त करण्याची घोषणा करणाऱ्यांचे घोडे क्षीरसागरांमुळेच अडणार आहे. भाजपाचे डॉ. योगेश क्षीरसागर आणि आ. संदीप क्षीरसागर एकत्र आले तर त्यांच्या २७ जागा होतात. म्हणजे सध्या तरी बहुमत त्यांच्याकडे आहे. त्यामुळे आगामी राजकारणात कुठल्यातरी एका क्षीरसागरला सोबत घेतल्याशिवाय नगरपरिषद उपाध्यक्ष व स्थायी समिती अजितदादा गटाकडे येणार नाहीत हे स्पष्ट आहे. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी बीड शहरांमध्ये उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या कार्यक्रमानंतर दुसऱ्याच दिवशी पुण्यात अजित दादा आणि आ. संदीप क्षीरसागर यांची भेट झाल्याने बीडच्या राजकारणात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या भेटीमध्ये नेमके काय घडले हे जरी बाहेर आले नसले तरी या भेटीमध्ये काहीतरी शिजतयं एवढे ▶▶ पान २ वर

## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून पीडित कुटुंबाला आर्थिक मदत



**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या रोहन बोंबे, शिवन्या बोंबे व भागुबाई जाधव यांच्या कुटुंबीयांना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या शिवसेनेतर्फे प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.**

ही मदत आमदार शरद सोनवणे व युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या हस्ते पीडित कुटुंबीयांना सुपूर्त करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी व्हिडिओ कॉलद्वारे पीडित कुटुंबीयांशी संवाद साधत ही घटना अत्यंत दुःखद व दुर्दैवी असल्याची भावना व्यक्त केली. या प्रसंगी युवासेना पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक सचिन बांगर, युवासेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे,पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजित चव्हाण, शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण थोरात पाटील, निरगुडसरचे सरपंच रविंद्र वळसे पाटील, वैभव पोखरकर, युवासेना तालुकाप्रमुख विकास राऊत, श्रीकांत लोखंडे, किरण ढोबळे, माजी सरपंच नरेश ढोमे, उपसरपंच विकास वरे, कैलास बोंबे, सोपान गावशेते, लक्ष्मण गायकवाड, माऊली ढोमे यांच्यासह शिरूर व आंबेगाव तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दोन धारदार तलवारींसह तलवाड्याचे तिघे गजाआड

### तीर्थपुरी पोलिसांची उत्तम कामगिरी पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**तलवाडा । प्रतिनिधी**

**तीर्थपुरी पोलीस ठाण्याच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे धडकेबाज कारवाई करत दोन धारदार तलवारी व एक पांढऱ्या रंगाची विनाक्रमांकाची स्विफ्ट कार असा एकूण ५ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई घनसावंगी तालुक्यातील तीर्थपूरी येथील मत्योदरी कॉलेजच्या पाठीमागील संभाजीनगर वस्ती परिसरात गुरुवारी (दि.१) रोजी करण्यात आली.**



पोलीस ठाणे तीर्थपुरी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार व पथकास आज सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मत्योदरी विद्यालयासमोर रस्त्याच्या बाजूला एक पांढऱ्या रंगाची विनाक्रमांकाची स्विफ्ट कारमध्ये तीन ते चारजण धारदार तलवारी बाळगून फिरत आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथक तत्काळ घटनास्थळी रवाना झाले. पोलीसांना पाहताच संबंधित स्विफ्ट कारमधील आरोपींनी गाडी कॉलेजच्या दिशेने पळवली. पोलिसांनी पाठलाग केला असता, मत्योदरी कॉलेजच्या पाठीमागे संभाजीनगर वस्ती येथे आरोपींनी गाडी सोडून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून तिघांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे बाळू लक्ष्मण फुलारे (वय ३५), अजय साहेबराव कुऱ्हाडे (वय २७) व शिवदास साहेबराव शिंदे (वय ३२ सर्व रा. तलवाडा, ता. गेवराई तालुका, जि. बीड) अशी आहेत. पंचासमक्ष तपासणीदरम्यान गाडीतून दोन लाकडी मुठी व लोखंडी पाते असलेल्या धारदार तलवारी तसेच एक पांढऱ्या रंगाची विनाक्रमांकाची स्विफ्ट कार असा एकूण ५,०२,००० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. हा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे तीर्थपुरी ▶▶ पान २ वर

## गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्रा.डॉ. अमित बिंदू यांना पीएच.डी.पदवी प्रदान

**माजलगाव । प्रतिनिधी**

गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथील प्राचार्य आणि गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित बिंदू यांनी पीएच.डी. ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल शिक्षणक्षेत्रात आनंद व अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. डॉ. अमित बिंदू यांना राजस्थान येथील सनराईज या प्रतिष्ठित विद्यापीठातर्फे फार्मास्युटिक्स या विषयात पीएचडी मिळाली आहे. त्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रबंधाचा विषय



''फॉर्म्युलशन, डेव्हलपमेंट अँड ईव्होल्युएशन ऑफ स्मुथ अँटीफंगल नॅनोजल'' हा होता. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी परिवाराच्या वतीने त्यांचे सहर्ष अभिनंदन करण्यात आले आहे.


डॉ.अमित बिंदू यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, संशोधनाची तळमळ, कठोर मेहनत आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली निष्ठा यांच्या जोरावर हे महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. अध्यापनासोबतच संशोधनाकडे असलेला त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन, नवनवीन विषयांचा सखोल अभ्यास आणि शैक्षणिक गुणवत्तेवर असलेला भर यामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांच्या ▶▶ पान २ वर

## बालाघाटाच्या कुशीत रंगली कुस्तीची दंगल

### बाळनाथ चौरे व हरि गोरेंच्या अंतीम लढतीने प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फिटले

**दिंद्रुड । पतिनिधी**

**राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर बालाघाटाच्या डोंगर कुशीतील धारूर तालुक्यातील कांदेवाडी येथे कुस्त्याच्या भव्य दंगलीचे आयोजन गुरुवारी एक जानेवारी रोजी करण्यात आले होते. चाट गावच्या हरी गोरे व जीवाची वाडी येथील बाळनाथ चौरे या मल्लांच्या अंतिम अनिर्णित कुस्तीने प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. जवळपास सात मिनिट चाललेल्या कुस्तीत पंचाना अखेर जोड काढावी लागली.**



कांदेवाडी येथे गेल्या दहा वर्षांपासून राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंती व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर कुस्तीच्या भव्य दंगलीचे आयोजन करण्यात येते. बीड जिल्ह्यासह आसपासच्या जिल्ह्यातील नामवंत कुस्तीपटू या दंगलीत सहभागी होत कुस्त्यांचे डाव टाकतात. दहा रुपयांपासून हजारो ▶▶ पान २ वर

## इंडियन मेडिकल असोसिएशन राष्ट्रीय मध्यवर्ती कार्यकारणीवर डॉ.राजेश इंगोले यांची निवड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राष्ट्रीय मध्यवर्ती कार्यकारणीवर महाराष्ट्राचे सदस्य म्हणून निवड झालेली आहे. डॉ.इंगोले यांच्या निवडीचे वैद्यकीय क्षेत्रातून स्वागत होत आहे.**



इंडियन मेडिकल असोसिएशन ही भारतातील डॉक्टरांची सर्वात मोठी वैद्यकीय संघटना आहे डॉक्टरांचे विविध प्रश्न तसेच डॉक्टरांच्या प्रॅक्टिससाठी नियमावली, शासकीय आरोग्य योजनांसाठी महत्त्वाचे सल्ले देणे तसेच जनतेच्या आरोग्य विषयक योजना यावर शासनाला सल्ले देणे ही महत्त्वाची कामे इंडियन मेडिकल असोसिएशन करीत असते. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सोलापूर येथे नुकत्याच झालेल्या वैद्यकीय परिषदेमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, सचिव डॉ.विक्रांत देसाई, डॉ.अनिल पाचनेकर यांनी ही निवड घोषित केली. अंबाजोगाई शाखेचे सात वर्षे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र इंडियन ▶▶ पान २ वर

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ५ जानेवारीला

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. ०५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे.

अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, ▶▶ पान २ वर

## अनादरीत धनादेशा प्रकरणी आरोपीस दहा लाख रुपये दंड व सहा महिने शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**

येथील अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी साहेब आठवे यांनी महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपीस तब्बल दहा लाख रुपयाचा दंड करून सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे, घटनेची हकीकत अशी की, आरोपी पंचफुला मधुकर जगताप,यांनी फिर्यादी सुनील मुरलीधर जगताप,यांच्याकडून दिनांक १२ /०८/ २०२१ रोजी रक्कम रुपये दहा लाख रुपये हात उसने म्हणून घेतले होते सदरची रक्कम परत करतेवेळी आरोपी यांनी फिर्यादी यांच्या हक्कांमध्ये रक्कम रुपये दहा लाख रुपयाचा युनियन बँक ऑफ इंडिया चा धनादेश दिला होता सदरचा धनादेश बँकेत वाटेल व फिर्यादीस त्याची आरोपीकडे असणारी रक्कम त्यास मिळून जाईल असा शब्द व भरवसा दिला होता, परंतु सदरचा धनादेश बँकेत अनादरीत झाला व खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणाने परत आला त्यामुळे फिर्यादी सुनील जगताप,यांनी आरोपी पंचफुला मधुकर जगताप यांच्या विरोधामध्ये बीड येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी ▶▶ पान २ वर

## संत-महंत,भाविकांच्या स्वागतासाठी फुलसांगवीनगरी सज्ज

### श्री.संत वामनभाऊ महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव सोहळा आज पासून प्रारंभ




**फुलसांगवी । प्रतिनिधी**

**श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचा सुवर्ण महोत्सव मौजे फुलसांगवी येथे आजपासून सुरू होत असून या सोहळ्याच्या निमित्ताने येणाऱ्या संत –महंत भाविक भक्तांच्या स्वागताची फुलसांगवीकरांच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली असून या ठिकाणी सभामंडपासह, डेकोरेशन, याचबरोबर जागोजागी भाविकांच्या सुख सोयीची व्यवस्था करून फुलसांगवी नगरी सज्ज झाली आहे.**

'वैराग्याचे महामेरू ' श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री. क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाचे संस्थापक तथा गडाचे मठाधिपती वै. महंत स्वामी निगमानंद महाराज प्रेरणेतून गेल्या पन्नास वर्षापासून जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद्? भागवत कथा नामयज्ञ सोहळा मोठ्या थाटामध्ये पार पडत आला आहे. वै. महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या पाश्चातही गेली पाच-सात वर्ष गडाचे उत्तराधिकारी महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली १६ मोठ्या थाटात पार पडत आला आहे. किंबहुना दिवसेंदिवस या सोहळ्याला महंत जनार्दन महाराज यांच्या मोठी व्यापकता येत चालली आहे. श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीचा यावर्षी सुवर्ण महोत्सव ▶▶ पान २ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार दि.०३ जानेवारी २०२६ । पान ७

# त्याला परदेशात जायला कोणी मदत केली? पासपोर्ट कोणी दिला? अजित पवारांचा मंत्री मोहोळांवर पलटवार

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात महायुती म्हणून एकत्र असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपविरुद्ध दंड थोपटले आहेत. त्यामुळे, या दोन्ही ठिकाणी भाजप विरुद्ध अजित पवारांची राष्ट्रवादी असाच थेट सामना आहे. त्यातच, पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला असून पुणे महापालिकेतही २ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपवर टीका केली. तसेच, पुण्यात गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारीवरुन भाजपने केलेल्या टीकेलाही त्यांनी प्रत्त्युत्तर दिलं आहे.**

सन १९९२ ते २०१७ पर्यंत मी पिंपरी चिंचवड शहराचा कायापालट केला, हवा तो विकास केला. मात्र, २०१७ साली एक लाट होती. त्यावेळी विठ्ठल मूर्ती घोटाळा झाला. आता त्यावेळी ज्या महापौरांच्या काळात हे झालं, आज ते महापौर आमच्या विरोधात लढणाऱ्या (भाजप) पक्षात गेले आहेत. शरद पवारांनी पिंपरीत विकासाला कशी गती दिली, हे सांगता अजित पवारांनी साहेबांचं कौतुक केलं. तसेच, यावेळी, भाजपवर गंभीर आरोप करत हफ्तेखोरी सुरु असल्याचा दावाही त्यांनी केला. अर्बन स्ट्रीटच्या



नावाखाली रस्त्यांची वाट लावलेली आहे, अनेक रस्त्यावर अतिक्रमण झालंय, तिथं हफ्तेखोरी सुरु असल्याचं दिसतं. गेल्या नऊ वर्षात भाजपच्या सत्ता काळात हा असला विकास झालाय. टेंडरमध्ये रिंग केली जाते, दादागिरी केली जाते. मी पुरावे देईन, पुराव्या शिवाय मी बोलणार नाही, कोणावर बिनबुडाचे आरोप करणार नाही, असे म्हणत अजित पवारांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच, गुन्हेगारी उमेदवारीवरुन मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केलेल्या टीकेवरुनही पलटवार दिला. एका व्यक्तीला परदेशात जायला कोणी मदत केली? त्याला पासपोर्ट कोणी दिला? तो कसा पळाला? त्यांनीसुद्धा गेल्या काही वर्षात कोणाकोणाला कशी उमेदवारी दिली, याची पण माहिती काढा, असे म्हणत अजित पवार यांनी मुरलीधर मोहोळ यांनीच निलेश घायवळला विदेशात जायला मदत केल्याचे संकेत दिले. तसेच, मी पुण्यात गेल्यावर भाजपची आणि माझी यादी दाखवतो. कोणाचे उमेदवार कसे आहेत हे पाहा, मग सगळं स्पष्ट होईल, असेही अजित पवारांनी म्हटले. तर, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या पुत्रावरही गुन्हे दाखल आहेत, असा आरोप काँग्रेसने केला होता. त्यावरूनही, अजित पवारांनी भूमिका मांडली. गुन्हे दाखल आहेत, पण त्यात तो दोषी ठरलाय का? आता माझ्यावर ७० हजार कोटींचे आरोप झाले, ज्यांनी आरोप केले त्यांच्या सोबत मी बसलोय ना? मग आरोप म्हणजे दोषी नाही, असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्र्यांनी दिलं.

## नाकाबंदी दरम्यान मोठी कारवाई; कात्रजमध्ये ६७ लाखांची रोकड जप्त



पुणे । प्रतिनिधी

**पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कात्रज येथील सर्व्हिलंन्स स्कॉड टीमने (एसएसटी) नाकाबंदी दरम्यान मोठी कारवाई केली. कात्रज जंक्शन येथील एसएसटी नाकाबंदी पॉईंटवर तपासणीदरम्यान टोयोटा हायरायडर चारचाकी वाहनातून तब्बल ६७ लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली असून संबंधित वाहनही ताब्यात घेण्यात आले आहे.**

शुक्रवारी सकाळी एसएसटी पथक प्रमुख अधिकारी आरोग्य निरीक्षक योगेश सुरेश माने यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान एमएच १२ व्ही.झेड. ४०१४ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची टोयोटा हायरायडर कार थांबवण्यात आली. वाहनात मालक तुषार विजय मिरजकर (३९, रा. सासवड, पुणे) असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्यासोबत वाहनात अनिल शंकर कामठे आणि गणेश बाळासाहेब जगताप हे दोघे उपस्थित होते. वाहनाच्या मागील डिकीत तपासणी केली असता लाल रंगाच्या पिशव्यांमध्ये विविध चलनी नोटांचे बंडल आढळून आले. चौकशीदरम्यान चालकाने ही रक्कम सासवड तालुक्यातील तक्रारवाडी येथील गट क्रमांक १३५ ही जमीन खरेदी करण्यासाठी रोख स्वरूपात देण्यासाठी नेत असल्याचे सांगितले. मात्र, निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर रक्कमेची शहानिशा आवश्यक असल्याने पंचनामा करून रक्कम जप्त करण्यात आली. ही संपूर्ण कारवाई पंचांच्या व पोलिसांच्या उपस्थितीत करण्यात आली असून रोकड सीलबंद करून ताब्यात घेण्यात आली आहे. संबंधित टोयोटा हायरायडर वाहनही महानगरपालिकेच्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे. प्रकरणाची माहिती नोडल अधिकारी श्रीपाद नाईक यांच्यामार्फत आयकर विभागाला देण्यात आली.

## पुणेकरांसाठी ३२ हजार कोटींचे प्रकल्प सुरू; मुख्यमंत्र्यांचे पुण्याला प्राधान्य

पुणे । प्रतिनिधी

**पुणे महानगर क्षेत्रात सध्या २२० महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पांची कामे सुरू असून या कामांसाठी राज्य सरकारने तब्बल ३२ हजार ५२३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. देश-विदेशातील गुंतवणूकदार पुण्यात उद्योग उभारण्यासाठी उत्सुक आहेत. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. उद्योगांना आकर्षित करुन घेण्यासाठी आणि पुणेकरांना दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्य दिले आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) बैठक नुकतीच झाली. या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि पुणेकरांचे शहरातील वास्तव्य आनंदी करण्यासाठी पुणे महानगर क्षेत्राचा एकात्मिक विकास करण्याचा आदेश दिला. पुणे महानगर क्षेत्रासाठी निर्धारित कालमर्यादेत पक्का आराखडा तयार करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या आहेत. पुणे महानगर क्षेत्रासाठीचा विकास आराखडा करण्यासाठी राज्य शासनाच्या 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' (मित्रा) संस्थेची चाचपणी केली जात आहे. हिंजवडी, बाणेर, बालेवाडी परिसरात आयटी, बँकिंग, फायनान्स क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची कार्यालये आहेत. या परिसरातील माण-म्हाळुंगे टाऊनशिप प्लॅनिंग योजनेला गती देण्याचेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. पुण्याचा रिंगरोड जवळपास वीस वर्षांपूर्वी म्हणजे २००७ मध्ये प्रस्तावित करण्यात आला होता. मात्र तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने या दिशेने पुढे काहीच काम केले नाही. गेल्या वीस वर्षात पुण्याच्या चहूबाजूने नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली. रिंग रोड पूर्ण करण्यास झालेल्या दिरंगाईचा फटका पुण्याच्या उपनगरांना सहन करावा लागतो आहे. अवजड वाहतुकीमुळे होणारी वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका, प्रवासाचा कालावधी वाढणे, प्रदूषण या समस्या यामुळे निर्माण झाल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी रिंग रोडच्या कामास गती दिली असून या प्रकल्पाचे काम वेगाने पुढे जाते आहे.

## नारायणगाव-ओझर रस्त्यावर ऊस वाहतूक ट्रॅक्टरची धडक; महिला ठार

नारायणगाव। प्रतिनिधी

**नारायणगाव-ओझर रस्त्यावर मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या दोन पादचारी महिलांना ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीची धडक बसून झालेल्या अपघातात एक महिला जागीच ठार झाली, तर दुसरी महिला गंभीर जखमी झाली. जखमी महिलेवर नारायणगाव येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना गुरुवारी (दि. १) सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अज्ञात चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती फौजदार जगदेव पाटील यांनी दिली.**

या अपघातात आशा नामदेव शेळके (वय ४७, रा. धनगरवाडी, ता. जुन्नर) यांचा मृत्यू झाला असून, कौशल्या भागुजी बेनके (वय ४५, रा. धनगरवाडी) ह्या गंभीर जखमी झाल्या आहेत. धनगरवाडी येथील आशा शेळके व कौसल्या बेनके ह्या गुरुवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास नारायणगाव-ओझर रस्त्याच्या कडेने धनगरवाडी येथून नारायणगावच्या दिशेने मॉर्निंग वॉक करीत होत्या. दरम्यान भरधाव ट्रॅक्टरमधील साऊंड सिस्टिमचा आवाज मोठ्याने करून नारायणगावच्या दिशेने निघालेल्या ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीने दोघींना मागून धडक दिली. या अपघातात ट्रॅक्टरच्या चाकाखाली सापडून आशा शेळके यांचा जागीच मृत्यू झाला तर कौसल्या बेनके या गंभीर जखमी झाल्या. या घटनेमुळे शेळके कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. अपघातानंतर ट्रॅक्टरचालक




हा ट्रॅक्टरसह फरार झाला. याप्रकरणी विनोद एकनाथ शेळके यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या घटनेमुळे नियमांचे उल्लंघन करून ट्रक व ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे होणारी धोकादायक ऊस वाहतूक जीवघेणी ठरत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या घटनेचा धनगरवाडी ग्रामस्थांनी निषेध केला आहे. दरम्यान नारायणगाव-ओतूर रस्त्याला धनगरवाडी ते कारखाना फाट्यादरम्यान वारंवार अपघात होत असल्यामुळे धनगरवाडी परिसरातील नागरिकांनी १२ वाजण्याच्या सुमारास कारखाना फाटा या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन केले. या रस्त्याला साईड पट्टे त्याचबरोबर गतिरोधक आणि रस्ता ओलांडण्याच्या ठिकाणी मोठा इंडिकेटर बसवण्यात यावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली. सुमारे अर्धा तास वाहतूक रोखून धरण्यात आली होती. नारायणगावचे फौजदार जयदेव पाटील व त्यांचे टीम घटनास्थळी पोहोचल्यावर त्यांनी वाहतूक सुरळीत केली. या आंदोलनामध्ये विघ्नहर साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, बाजार समिती संचालिका प्रियांका शेळके सहभागी झाल्या होत्या.

## रुग्णाच्या नावाखाली सापळा; सहकारनगर हद्दीत डॉक्टरला लुटणारे सीसीटीव्हीत कैद!

पुणे । प्रतिनिधी

**वैद्यकीय तपासणीच्या बहाण्याने बोलावून चोरट्यांनी एका डॉक्टरला चाकूचा धाक दाखवून दागिने, रोकड असा सुमारे साडेचार लाख रुपयांचा ऐवज लुबाडून नेला. ही घटना पुणे-सातारा रस्त्यालगत होंडा शोरूमच्या बाजूला घडली. याप्रकरणी बालाजीनगर, धनकवडी येथील एका ४९ वर्षीय डॉक्टरने सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी रुग्णाच्या वैद्यकीय तपासणीच्या नावाखाली डॉक्टरांना फोन करून बुधवारी (ता. ३१) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास तपासणीसाठी बोलावले. त्यानुसार डॉक्टर




दवाखाना बंद करून गेले असता, होंडा शोरूमजवळील अथर्व फरिहाज इमारतीच्या पार्किंगमध्ये दबा धरून बसलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना गाठले. यावेळी एका चोरट्याने डॉक्टरांच्या गळ्याला चाकू लावला. झटापटीत डॉक्टरांच्या डाव्या हाताच्या बोटाला चाकू लागून ते किरकोळ जखमी झाले. त्यानंतर दुसऱ्या चोरट्याने डॉक्टरांची दुचाकी, मोबाईल, पिशवीतील ३० हजार रुपयांची रोकड तसेच सुमारे एक लाख रुपये किमतीचे सातशे ग्रॅम वजनाचे चांदीचे भांडे असा मुद्देमाल हिसकावून नेला. हे चांदीचे भांडे दुरुस्तीसाठी पत्नीने दिलेले होते, घरी परतताना डॉक्टर ते सोबत घेऊन जात होते. या घटनेनंतर डॉक्टरांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात धाव घेतली. त्यानुसार पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुरुवारी (ता. १) गुन्हा दाखल केला आहे. चोरटे परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, फुटेजच्या आधारे त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिस उपनिरीक्षक सद्दाम फकीर यांनी दिली.

## धायरीच्या शिरपेचात मानाचा तुरा; प्रथमेश जाधवच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राष्ट्रीय ड्रिपबॉल चॅम्पियन

खडकवासला । प्रतिनिधी

**उत्तर प्रदेशातील मथुरा येथे पार पडलेल्या पहिल्या राष्ट्रीय ड्रिपबॉल अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र राज्याने ऐतिहासिक विजय मिळवत विजेतेपद पटकावले आहे. ड्रिपबॉल संघाचे नेतृत्व पुण्याच्या धायरी भागातील एका सर्वसामान्य कुटुंबातील तरुण, कु. प्रथमेश प्रशांत जाधव याने केले, ज्यामुळे धायरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

मथुरा येथील रिअल इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत देशभरातील १० राज्यांच्या संघांनी




आपला सहभाग नोंदवला होता. बास्केटबॉल, नेटबॉल आणि व्हॉलीबॉल या खेळांचे मिश्रण असलेल्या या नाविन्यपूर्ण ड्रिपबॉल खेळात महाराष्ट्राच्या संघाने सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व राखले आणि अंतिम फेरीत विजय मिळवून नॅशनल चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. यावेळी ड्रिपबॉल इंडियाचे राष्ट्रीय महासचिव डॉ. अरविंद चित्तौडिया यांनी खेळाडूंचे कौतुक करताना सांगितले की, ''ड्रिपबॉल हा केवळ एक खेळ नसून तो युवकांसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. लवकरच या खेळाचा समावेश शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये केला जाईल.'' तसेच, जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात दक्षिण आशियाई चॅम्पियनशिपचे आयोजन केले जाणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. एका सर्वसामान्य कुटुंबातून जिद्दीच्या जोरावर भारतीय संघाचा कर्णधार बनलेल्या प्रथमेश जाधवचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच्या या यशामुळे स्थानिक खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळाली आहे.

## गर्दी वाढली पण शिस्त मोडली नाही जिल्हाधिकाऱ्यांकडून यंत्रणेचे कौतुक



शिक्रापूर । प्रतिनिधी

**पेरणेफाटा येथील २०८ व्या शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी आलेल्या अनुयायांची गैरसोय होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पीएमपीएलने केलेले संयुक्त नियोजन यशस्वी झाले.**

यंदाच्या वर्षी गर्दीचा ओघ २० टक्क्यांनी वाढेल असा अंदाज वर्तवत प्रशासनाने शिक्रापूर आणि लोणीकंद येथे स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करून तेथून बसद्वारे प्रवासाची सोय केली होती. या उत्कृष्ट नियोजनामुळे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सर्व विभागांच्या कामगिरीवर कौतुकाची थाप मारली आहे.महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यंदा मोठ्या संख्येने अनुयायी उपस्थित झाले होते. प्रशासनाने भाविकांना उन्हाचा तडाखा बसू नये यासाठी बस थांब्यांवर छताची व्यवस्था केली होती. नगर बाजूकडे १० आणि चाकण बाजूकडे ५ असे स्वतंत्र बस थांबे उभारण्यात आले होते. पीएमपीएलच्या वतीने १२६० बसेसची व्यवस्था करण्यात आली होती, ज्याद्वारे अनुयायांना पार्किंग स्थळापासून विजयस्तंभ, वढू बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज समाधी आणि गोविंद गोपाळ गायकवाड समाधी स्थळापर्यंत ने-आण करण्यात येत होती. अभिवादन करून बाहेर पडणाऱ्या भाविकांना तात्काळ बस उपलब्ध होत असल्याने अनुयायांनी समाधान व्यक्त केले. कोरेगाव भीमा बस स्थानकावरून नगर आणि चाकण बाजूला जाणाऱ्या ६३० बसेस आणि एकूण १२६० बसेसच्या सहाय्याने सुमारे चार हजार कर्मचाऱ्यांनी अहोरात्र सेवा दिली. कोणत्याही प्रकारची चेंगराचेंगरी किंवा वाहतूक कोंडी होऊ न देता भीम अनुयायांची ने-आण करण्यात आली. हे यश जिल्हा पोलीस, पीएमपीएल कर्मचारी आणि बस स्थानक उभारणाऱ्या बांधकाम विभागाच्या सांघिक प्रयत्नांचे असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी नमूद केले. जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने शिरूर आणि हवेली तालुक्याच्या हद्दीत एकूण २१ उपचार केंद्र उभारण्यात आली होती. या केंद्रांच्या माध्यमातून सुमारे १० ते १२ हजार अनुयायांनी विविध आरोग्य सुविधांचा लाभ घेतला. प्रवासादरम्यान किंवा गर्दीत त्रास होणाऱ्या नागरिकांना तात्काळ उपचार पुरवण्यात आल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश गोरे व राजेश कट्टीमनी यांनी दिली.

## पिंपरखेड बिबट्या हल्ला प्रकरणी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाखांची मदत

पिंपरखेड । प्रतिनिधी

**पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्यात रोहन विलास बोंबे, शिवन्या शैलेश बोंबे व जांबुत येथील भागुबाई जाधव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनेची तातडीने दखल घेत घटनास्थळी भेट देऊन मृतांच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी शिवसेनेतर्फे आर्थिक मदत जाहीर केली होती.**

त्यानुसार या तिन्ही कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपये आर्थिक मदत किल्ले शिवनेरी, जुन्नरचे आमदार शरद सोनवणे व युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या हस्ते पीडित कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे मृतांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत ही घटना अत्यंत दुःखद व दुर्दैवी असल्याची भावना व्यक्त केली. शासन व शिवसेना पीडित कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभी असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वनविभागाला ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी युवासेना कार्यकारिणी सदस्य व पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक सचिन बांगर, युवासेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे, पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजित चव्हाण, शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण थोरात पाटील, निरगुडसर गावचे सरपंच रविंद्र वळसे पाटील, युवासेना शिरूर लोकसभा अध्यक्ष वैभव पोखरकर, युवासेना तालुकाप्रमुख विकास राऊत, श्रीकांत लोखंडे, किरण ढोबळे, माजी सरपंच नरेश ढोमे, उपसरपंच विकास वरे, कैलास बोंबे, कमलेश ढोमे, सोपान गावशेते, लक्ष्मण गायकवाड, माऊली ढोमे यांच्यासह शिरूर व आंबेगाव तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी, युवासैनिक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमेदवारी नाकारताच राष्ट्रवादी शरद पवार पक्षात खदखद

### पुण्यात बैठकीत इच्छुकांचा गोंधळ!

पुणे । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातील उमेदवारी न मिळालेल्या उमेदवारांनी पक्षाच्या मार्केट यार्ड येथील कार्यालयात गोंधळ घातला. पक्षाच्या नेत्यांची बैठक सुरू असतानाच हा गोंधळ झाल्याने पक्षाची बैठक तत्काळ गुंडाळण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये जागा वाटपाचे निश्चित झालेल्या सूत्राचे पालन न करता दोन्ही पक्षांनी उमेदवारांना मोठ्या प्रमाणात एबी फॉर्मचे वाटप केले.**

त्यावरून दोन्ही पक्षांचे उमेदवार निवडणुकीमध्ये एकमेकांच्या विरोधात येणार असल्याचे चित्र तयार झाले होते. या गोंधळावर मार्ग



काढण्यासाठी गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मार्केट यार्ड येथील निसर्ग कार्यालयामध्ये बैठक घेतली होती. यावेळी पक्षाचे प्रवक्ते अंकुश काकडे, माजी खासदार ॲड.वंदना चव्हाण, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विशाल तांबे, माजी आमदार कमल ढोले पाटील, माजी नगरसेवक रवींद्र माळवदकर, भगवानराव साळुंखे आदी उपस्थित होते. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हडपसर परिसरातील इच्छुक उमेदवार, त्यांच्या कार्यकर्त्यांसह कार्यालयात दाखल झाले. त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत, संताप व्यक्त केला. तसेच जागा वाटप मनमानी पद्धतीने करण्यात आली, पैसे घेऊन उमेदवारी दिली, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष संपविण्याचा घाट घालण्यात आला आहे, या स्वरूपाचे आरोप संतप्त इच्छुक उमेदवारांनी केली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक विभागाचे अध्यक्ष किशोर कांबळे यांच्यासमवेत वादावादी झाली. दरम्यान, या सगळ्या गोंधळामुळे भावनिक झालेल्या काकडे यांनी इच्छुक उमेदवारांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, पक्षाची नियोजित बैठक तत्काळ गुंडाळण्या आली.

cmyk